# ंदगी

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बी. बा
वा. क्र. १६५५८

सुरेश शर्मा



IRBK-0116564
IRBK-0116564

वाचन शाखा
31-8-1968
वा.वा.

# चांद जादी

(सचित्र)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. 96767 नों. दि 31-8-1968
वि. वा.वा. ........ .........

सुरेश शर्मा

IRBK-0116564
IRBK-0116564

रम्यकथा प्रकाशन, पुणें–३०

मूल्य : २॥ रुपये

स म र्प ण

कुमारी कल्पना देवधर
हिला

—सुरेश शर्मा

प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन,
३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिग, पुणें–३०.

प्रथमावृत्ति : मार्च १९७६

पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
वा. ग. मेहेंदळे,
जयभारत मुद्रणालय
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

## स म र्प ण

कुमारी कल्पना देवधर

हिला

—सुरेश शर्मा

# चांदजादी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ... नों दि ...
कि. ...

## एक

पुरातन कालची गोष्ट आहे ही. त्यावेळीं इराण देशांत शहर्यार नांवाचा बादशहा राज्य करीत होता. तो बादशहा फार समंजस होता, त्यामुळें त्याची प्रजा त्याचा मान राखीत असे.

त्या शहर्यारचा एक भाऊ होता. त्याचें नांव होतें शहाजहान. त्या दोन्ही भावांचें परस्परांवर फारच प्रेम होतें.

एक दिवशीं शहर्यारनें आपला भाऊ दुःखी असल्याचें पाहिलें, तेव्हां त्यानें त्याला विचारलें, 'शहाजहान, आज तुझा चेहरा खिन्न कां दिसतो?'

त्यावर शहाजहान म्हणाला, 'माझी बेगम माझें सांगणें ऐकत नाहीं. ती माझा तिटकारा करते.'

बादशहा शहर्यारनें आपल्या भावाचें कसेंबसें सांत्वन केलें;
या दिवसांनंतर आपलीहि तशीच अवस्था झाली
ाला दिसलें! त्याचीहि बेगम त्याच्यावर रुसली

त्यासाठीं त्या देशाच्या नियमानुसार बादशहानें आपल्या बेगमेला घरांतून घालवून दिलें. त्या दिवसापासून तो कुणाहि स्त्रीवर विश्वास ठेवीनासा झाला. बायकांवर सूड उगवण्याची त्यानें एक युक्ति शोधून काढली. तो दररोज एका स्त्रीशीं लग्न लावूं लागला अन् दुसऱ्या दिवशीं सूर्योदयापूर्वीं तिचें तलवारीनें मुंडकें मारूं लागला.

त्या काळीं राजा करील ती पूर्व दिशा अन् भट सांगेल ती अमावास्या अशी अवस्था असल्यामुळें बादशहाच्या विरुद्ध बोलण्याचें धाडस कुणालाच होत नसे ! असें असलें, तरी बादशहाच्या त्या विवाहपद्धतीमुळें साऱ्या देशांत खळबळ उडाली. सारे लोक बादशहाला दोष देऊं लागले.

त्या बादशहाचा एक वजीर होता. त्याला दोन मुली होत्या. त्यांतल्या मोठ्या मुलीचें नांव होतें चांदजादी. ती चंद्रासारखी देखणी होती. धाकट्या मुलीचें नांव होतें सोनाजादी. तिची अंगकांति सोन्यासारखी पिवळीधमक होती.

चांदजादी जितकी देखणी होती, तितकीच ती शहाणीहि होती. तिनें बरेचसे ग्रंथ वाचले होते, त्यामुळें तिच्या ज्ञानांत भर पडली होती.

ती एक दिवशीं आपल्या बापापाशीं गेली अन् त्याला म्हणाली, 'अब्बाजान, माझी एक इच्छा आहे, ती तुम्हीं पुरी कराल का ?'

'हो, जरूर बेटी ! सांग, तुझी कोणती इच्छा आहे ?' तिला वजिरानें विचारलें.

'अब्बाजान, आतांशा बादशहा शहर्यारला रक्ताची तहान लागलेली दिसते. तो रोज देखण्या नि तरण्या मुलींना ठार मारीत

असतो. त्याची ती निर्दयता मला बंद पाडायची आहे. त्यासाठीं तुम्ही त्याच्याशीं माझें लग्न लावून द्या म्हणजे झालें!' चांदजादीनें आपल्या बापाला सांगितलें.



त्यावर वजीर म्हणाला, 'बेटी, तुला वेड तर नाहीं ना लागलें? बादशहानें आतापर्यंत बऱ्याचशा मुलींना ठार मारलें आहे. तुलाहि त्याच तलवारीनें तो ठार मारल्याशिवाय रहाणार नाहीं!' वजीर आपल्या मुलीला समजावून सांगू लागला.

पण चांदजादी म्हणाली, 'होय, अब्बाजान, त्या संकटाची मला पूर्ण कल्पना आहे; तथापि त्या संकटाला मी मुळींच भीत नाहीं. कदाचित माझी युक्ति सफल झालीच, तर माझ्या देशाची फार मोठी सेवा केल्याचें श्रेय मला मिळेल.'

अखेरीस वजिरानें आपल्या मुलीच्या म्हणण्यास कबुली दिली अन् दुःखी मनानें तो लग्नाच्या तयारीला लागला.

लग्नाच्या दिवशीं चांदजादीनें आपल्या धाकट्या बहिणीला सांगितलें, ' सोनाजादी, तूंहि माझ्याबरोबर ये. तूं माझ्या खोलींत झोंप अन् दुसऱ्या दिवशीं सूर्य उगवण्यापूर्वी मला एक गोष्ट सांगायला सांग, म्हणजे मी तुला एक छानदारशी गोष्ट सांगेन. रोज हाच क्रम चालूं ठेवायचा. मी माझ्या देशांतील स्त्रियांचें दुःख दूर करीन असा मला विश्वास वाटतो. '

अन् चांदजादीच्या म्हणण्याप्रमाणें सारें घडून आलें !

लग्नाच्या रात्रीं सोनाजादी आपल्या मोठ्या बहिणीसोबत तिच्या खोलींत झोंपली.

पहांट होतांच तिनें चांदजादीला जागें केलें अन् ती तिला म्हणाली, ' एखादी चांगलीशीं गोष्ट सांग ना मला. '

अन् चांदजादीनें तिला गोष्ट सांगण्यास सुरुवात केली—

✦ ✦

# दोन

फार जुन्या काळची गोष्ट आहे ही. एका शहारांत एक धनिक शेतकरी रहात होता. व्यापाराच्या निमित्तानें तो लांब-लांबचा प्रवास करीत असे.

एकदां तो आपला व्यापार आटोपून आपल्या घरीं चालला होता. चालतां चालतां त्याला वाटेंत भूक लागली, म्हणून तो एका झऱ्यापाशीं थांबला. त्या झऱ्यांतून थंडगार पाणी वहात होतें. तिथें त्यानें हात, पाय नि तोंड धुतल्यावर भाकर तुकडा खाल्ला. त्यानंतर तो ज्या घोड्यावर बसून प्रवास करीत होता, त्या घोड्याला चरण्यासाठीं त्यानें मोकळें सोडलें. घोड्याचें पोट भरल्यावर तो पुढील प्रवासाच्या तयारीला लागला. त्यापूर्वी त्यानें आपल्या अंगरख्याच्या खिशांतून थोडासा खजूर बाहेर काढला अन् तो खाल्ल्यावर त्याच्या बिया इकडे तिकडे फेंकून दिल्या.

त्यानंतर पुढचा प्रवास करण्यासाठीं तो सौदागर आपल्या घोड्यावर स्वार झाला; पण तितक्यांत सफेत दाढी असलेला एक

वेताळ त्याच्यासमोर येऊन उभा राहिला. त्या वेताळाला पहातांच तो सौदागर घाबराघुबरा झाला. वेताळाच्या हातांत एक नंगी तलवार होती. ती तलवार हलवीत तो वेताळ सौदागराला म्हणाला, 'उतर खालीं अगोदर! मी या तलवारीनें आज तुझी खांडोळीं करणार!'

त्या वेताळाचें बोलणें ऐकतांच आपल्या पायांखालची जमीन सरकत आहे असें सौदागराला वाटलें! तो भीतीमुळें थरथर कांपूं लागला अन् तशाच स्थितींत त्यानें वेताळाला विचारलें, 'तूं मला कां म्हणून ठार मारणार? मीं तुझें कोणतें नुकसान केलें आहे?'

'तूं माझ्या मुलाला ठार मारलें आहेस!' वेताळ म्हणाला.

त्यावर सौदागर रडत-रडत म्हणाला, 'तुझा मुलगा काळा कीं गोरा तेंसुद्धां मला माहीत नाहीं. त्याला जर मीं पाहिलेंच नाहीं, तर ठार कसा मारणार?'

वेताळ किंचाळून म्हणाला, 'माझा मुलगा इथें खेळत होता. तूं फेकून दिलेल्या खजुराच्या बियांमुळें त्याचे डोळे फुटले अन् अखेर तो तडफडून मेला म्हणून मी त्याचा बदला घेणार!'

त्यावर सौदागर वेताळाला म्हणाला, 'तसें असेल तर मला माफ कर; कारण मीं त्याला जाणूनबुजून ठार मारलें नाहीं!'

वेताळ म्हणाला, 'छे, छे, मी तुला ठार मारणारच!'

सौदागर रडत रडत म्हणाला, 'माझ्यावर दया कर. मी बालबच्चेवाला माणूस आहें.'

'तें मला कांहीं ठाऊक नाहीं!' वेताळानें त्याला धमकी दिली, 'मी तुला जिवंत सोडणार नाहीं!'

तितक्यांत सूर्य उगवला, त्यामुळें चांदजादीनें आपली गोष्ट तिथेंच सोडली. शहर्यारला ती गोष्ट फार आवडली. पुढें काय

झालें तें त्याला ऐकायचें होतें; पण सूर्योदय झाल्यामुळें तो प्रातर्विधि उरकण्यासाठीं तिथून निघून गेला.

सोनाजादी बहिणीला म्हणाली, 'तूं तर फारच चांगली गोष्ट सांगितलीस.'

चांदजादी म्हणाली, 'पुढची गोष्टसुद्धां हिच्याहिपेक्षां छान असल्यामुळें आज रात्रीं बादशहा ती गोष्ट ऐकल्याशिवाय रहाणार नाहीं अशी माझी खात्री आहे!'

पुरी गोष्ट ऐकून घेतल्याशिवाय आपण चांदजादीला ठार मारायचें नाहीं असें बादशहानें मनांत ठरविलें अन् तो राज्यकारभार पहाण्यासाठीं आपल्या दरबारांत निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं पहांट झाल्यावर सोनाजादीनें आपल्या वडील बहिणीस जागें केलें अन् पुढची गोष्ट सांगण्यास सांगितलें.

चांदजादीनें पुढची गोष्ट सांगण्यास सुरुवात केली–



त्या वेताळानें सौदागराला ठार मारण्यासाठीं आपल्या हातांतली तलवार उगारतांच तो सरदार कळवळून त्याला म्हणाला, 'तूं जर मला ठारच मारणार असशील, तर त्यापूर्वी माझें एकच म्हणणें आहे तें ऐक. मी मरायला तयार आहें; तथापि मरण्यापूर्वी माझी बायको नि माझीं मुलेंबाळें यांना पहाण्याची माझी इच्छा आहे. मीं तुला वचन देतों कीं, बरोबर एक वर्षानें आजच्याच दिवशीं मी पुन्हां इथें येईन, त्यावेळीं तूं मला खुशाल ठार मार!'

त्यावर वेताळ म्हणाला, 'ठीक आहे. तूं आतां आपल्या घरीं जा; पण आपल्या वचनाला जाग म्हणजे झालें!' असें म्हणून तो वेताळ लगेच अदृश्य झाला.

तो सौदागर दुःखी मनानें आपल्या घरीं आला अन् त्यानें त्या वेताळाबाबतची सारी हकीकत आपल्या घरांतील माणसांना सांगितली. ती ऐकल्यावर घरांतल्या माणसांना अतिशय दुःख झालें. हळूहळू एक वर्ष संपलें. सौदागरानें आपल्या येण्यादेण्याचा व्यवहार पूर्ण केला अन् उरलेला पैसाअडका गोरगरिबांना वांटून टाकला!

त्यानंतर तो सौदागर आपल्या वचनाची पूर्तता करण्यासाठीं घर सोडून जाऊं लागला, तेव्हां घरांतील माणसें त्याला म्हणालीं, 'आम्हीहि येतों तुमच्यासोबत.'

तेव्हां घरांतल्या माणसांची समजूत घालण्यासाठीं तो त्यांना म्हणाला, 'देवाच्या मनांत जसें असेल तसें घडेल. तुम्ही सारीं इथें रहा अन् मला जाऊं द्या.'

सगळ्यांना रडत ठेवून तो सौदागर घरांतून निघून गेला अन् एक वर्षापूर्वी ज्या जागीं त्याची वेताळाशीं गांठ पडली होती

त्या झऱ्यापाशीं योग्य वेळीं जाऊन पोहोंचला.

तिथें पोहोंचल्यावर तो आपल्या घोड्यावरून खालीं उतरला अन् झऱ्याच्यापाशी वेताळाची वाट पहात बसला.

तितक्यांत तिथें एक म्हातारा माणूस आला अन् सौदागराला सलाम करून त्याला म्हणाला, ' अरे भाई, तूं इथें कां बरें बसला आहेस ? ही जागा धोक्याची आहे. या जागेला मसणवट म्हणतात. इथें भुतांखेतांचें वास्तव्य असतें. '

त्यावर सौदागरानें त्याला पूर्वी घडलेली हकीकत सांगितली.

म्हातारा म्हणाला, ' मग मीहि तुझ्याच सोबत इथें थांबतों. पाहूंया तो वेताळ आमचें काय करतो तें. '

त्या म्हाताऱ्याच्या सोबत त्याचा एक सेवकहि होता. ते तिघेहि इसम तिथेंच बसले अन् आपापसांत बोलूं लागले.

कहाणी सांगतां सांगतां चांदजादी बहिणीला म्हणाली, ' आतां सूर्य उगवला, त्यामुळें ही कहाणी मी इथेंच थांबवितें अन् पुढची कहाणी उद्यां पहांटेला सांगतें. पुढची कहाणी तर हिच्याहिंपेक्षां चांगली आहे ! '

बादशहा शहर्यारला संपूर्ण कहाणी ऐकायची होती, त्यामुळें त्यानें त्या दिवशीं चांदजादीला ठार मारलें नाहीं !

तो दिवस तसाच गेला अन् त्या रात्रीं पूर्वीप्रमाणें तिघेंहि माणसें एकाच खोलींत झोंपलीं.

दुसऱ्या दिवशीं पहांट होतांच सोनाजादीनें आपल्या वडील बहिणीस जागें केल्यावर ती पुढील कहाणी सांगूं लागली–

सौदागर अन् तो म्हातारा असे दोघेहि आपापसांत गप्पागोष्टी करीत बसले होते, इतक्यांत त्या झऱ्यापाशीं आणखीन एक इसम आला. त्या इसमासोबत दोन काळे कुत्रे होते.

कुत्रेवाल्या इसमानें त्या बोलत बसलेल्या दोघांहि माणसांना सलाम केला अन् त्यांना विचारलें, ‘या ओसाड जागेंत तुम्ही कशाला बसलां आहांत ?’

तेव्हां त्यांच्यांतल्या म्हाताऱ्या इसमानें सौदागराची सारी हकीकत त्याला सांगितली, तेव्हां तो आश्चर्यचकित झाला अन् त्यांना म्हणाला, ‘मीहि तुमच्यासोबत इथेंच बसतों अन् पुढें काय होतें तें पहातों.’

तो कुत्रेवाला माणूस तिथेंच बसला. तितक्यांत एक बुटका म्हातारा तिथें येऊन दाखल झाला ! ‘मियां मूठभर अन् दाढी हातभर’ अशी त्या बुटबैंगणाची अवस्था होती ! तो बुटका असला, तरी त्याची दाढी वरीच लांब होती. आपल्या लांब दाढी-वरून हात फिरवतां फिरवतां त्यानें बाकीच्या इसमांस विचारलें, ‘अरे, तुम्ही इथें बसून काय करताहांत ? अन् हा सौदागर असा खिन्न कां दिसतो ?’

तेव्हां पहिल्या म्हाताऱ्यानें त्याला सारी हकीकत सांगितली.

त्या बुटक्या म्हाताऱ्यानें थोडा वेळ आपलें डोकें खाजविलें अन् नंतर तो बाकीच्यांना म्हणाला, ‘तर मग मीहि इथेंच बसतों. पाहूंया तरी तो वेताळ कसलासा आहे तें !’

ते सारे इसम त्या झऱ्यापाशीं बसल्यानंतर थोड्या वेळानें तिथलें वातावरण धूम्रमय झालें. हळूहळू तो धूर विरळ झाल्यावर त्याजागीं एक वेताळ उभा असल्याचें सर्वांनीं पाहिलें.

त्या वेताळाची दाढी बेंबीपर्यंत वाढली होती अन् त्याच्या हातांत एक नंगी तलवार तळपत होती !

सौदागरापाशीं आल्यावर तो वेताळ मोठ्यानें ओरडला, ‘उभा रहा, आज मी या तलवारीनें तुझी गर्दन छाटणार. माझ्या

मुलाला तूं ठार मारलेंस, त्याचा मी आज बदला घेणार!'

पण तितक्यांत सूर्योदय झाल्यामुळें चांदजादीनें आपली कहाणी अर्ध्यावरच आवरली. बादशहा शहर्यारला ती कहाणी अतिशयच आवडली होती नि त्या कहाणीचा शेवट कसा होतो तें त्याला ऐकायचें होतें, त्यामुळें त्यानें चांदजादीला त्या दिवसापुरतें जीवदान दिलें!

अशा रीतीनें चांदजादीचें मरण आजचें उद्यांवर ढकललें गेलें. तो दिवस संपला नि त्यानंतरची रात्रहि संपली.

दुसऱ्या दिसशीं पहांटेला आपली अपुरी राहिलेली कहाणी चांदजादीनें पुढें सांगायला सुरुवात केली –

त्यानंतर तो वेताळ आपल्या हातांतली तलवार हवेंत हलवीत हलवीत सौदागरापाशीं जाऊं लागला. तें पहातांच पहिला म्हातारा धांवत धांवत वेताळापाशीं गेला नि त्यानें त्याच्या पायांवर आपलें डोकें ठेवलें!

तो म्हातारा वेताळाची विनवणी करूं लागला. तो म्हणाला, 'हुजूर, थोडा वेळ थांबा. मी आपल्याला माझ्या या सेवकाची विचित्र गोष्ट सांगतों अन् ती जर आपल्याला पसंत पडली, तर आपण दयेदाखल या सौदागराला त्याच्या शिक्षेपैकीं फक्त एक तृतीयांश शिक्षा माफ करा!'

वेताळानें कांहीं वेळ विचार केला अन् त्यानंतर तो ती गोष्ट ऐकायला तयार झाला!

✦ ✦

## तीन

तो म्हातारा वेताळाला आपली हकीकत सांगूं लागला—

तुम्हांला ऐकून आश्चर्य वाटेल; पण माझ्याबरोबरचा हा सेवक एका दृष्टीनें माझा पुतण्या आहे अन् दुसऱ्या दृष्टीनें माझी पत्नीहि आहे. ती बारा वर्षांची असतांना मी तिच्याशीं लग्न लावलें; पण तिला मूलबाळ न झाल्यामुळें मी माझ्या घरांतल्या मोलकरणीशीं पुन्हां लग्न लावलें अन् त्यानंतर तिला एक सुस्वरूप मुलगाहि झाला.

माझी पहिली पत्नी आपल्या सवतीशीं अन् तिच्या मुलाशीं दुष्टाव्यानें वागत असे. तिनें जादूच्या द्वारें आपल्या सवतीला बकरी अन् तिच्या मुलाला बकरा बनविलें अन् त्यानंतर ती बकरी नि तो बकरा हीं माझ्या नोकराला देऊन टाकलीं! मी त्यावेळीं घरांत नव्हतों. बाहेर कुठेंतरी गेलों होतों. घरीं आलों, तेव्हां माझी दुसरी बायको मेली अन् मुलगा बाहेर कुठेंतरी गेला आहे असें माझ्या पहिल्या पत्नीनें मला सांगितलें. मी तिचें सांगणें खरें मानलें.

दुसऱ्या दिवशीं बकरीदचा सण होता, त्यामुळें 'कुर्बानी करण्यासाठीं एखादें जनावर आण' असें मीं माझ्या नोकराला सांगितलें.

त्यानें जी बकरी आणली, ती माझी दुसरी पत्नी होती ! तिला माझ्यापुढें आणतांच ती माझ्या पायांवर कोसळली अन् रडूं लागली.

मला तिची दया आली म्हणून मी माझ्या हातांतला सुरा माझ्या नोकराच्या हातीं दिला अन् त्याला तिची कुर्बानी करण्यास सांगितलें.

नोकरानें त्या बकरीचा गळा कापला. त्यानंतर त्यानें दुसरें एक जनावर आणलें; पण त्यानें आणलेला बकरा हा माझ्या दुसऱ्या पत्नीपासून मला झालेला माझा मुलगा होता ! असें असलें, तरी ती गोष्ट मला माहीत नव्हती. तो बकराहि माझ्या पायांपाशीं कोसळला नि रडूं लागला.

तेव्हां मला त्याची दया आल्यामुळें मी त्या बकऱ्याला सोडून दिलें, तेव्हां माझी पहिली पत्नी मला म्हणाली, 'या बकऱ्याची कुर्बानी केलीच पाहिजे. हा बकरा फारच चांगला आहे !'

मी तिला समजावून सांगितलें, 'मला या बकऱ्याची दया येते. पाहिलेंस ना कसा रडतो आहे तें ? मी याला सोडून देतों अन् कुर्बानी करण्यासाठीं दुसरा बकरा आणायला सांगतों.'

माझें सांगणें ऐकल्यावर ती माझ्यावर भडकली अन् मला म्हणाली, 'तुम्हांला कुर्बानी करवत नसेल तर मीच करतें याची कुर्बानी !' असें म्हणून ती त्या बकऱ्याकडे करड्या नजरेनें पाहूं लागली.

त्यामुळें माझा निरुपाय झाला. मी त्या बकऱ्याला एका खुंटीला बांधलें नि त्याचा गळा कापण्यासाठीं हातांत भलामोठा सुरा घेतला.

इतकी कहाणी सांगितल्यावर सूर्योदय झाल्यामुळें चांदजादी थांबली, तेव्हां सोनाजादी तिला म्हणाली, 'आज तूं कहाणीच्या बाबतींत कमाल केलीस. माझें अंतःकरण भरून आलें.'

त्यावर चांदजादी तिला म्हणाली, 'जर बादशहानें मला आज जिवंत ठेवलें, तर उरलेली कहाणी मी उद्यां पहांटेला सांगेन. पुढची कहाणी तर हिच्याहिपेक्षां विचित्र आहे. तशा प्रकारची कहाणी तूं आतापर्यंत कधींहि ऐकली नसशील.'

त्या बकऱ्याचें पुढें काय झालें अन् कहाणीचा शेवट कसा होणार तें ऐकून घेण्याची शहर्यारची इच्छा होती; म्हणून कहाणी पुरी होईस्तोंवर चांदजादीला ठार मारायचें नाहीं असें त्यानें मनांत ठरविलें

तो दिवस गेला अन् रात्रहि संपत आली, तें पाहून चांदजादीनें पुढची कहाणी सांगायला सुरुवात केली—

तो म्हातारा वेताळाला म्हणाला, 'त्या बकऱ्याची कुर्बानी करण्यासाठीं जेव्हां मी माझ्या हातांतला सुरा वर उचलला, तेव्हां तो बकरा डबडबत्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहूं लागला. त्याची ती केविलवाणी अवस्था पहातांच माझ्या अंगांतलें अवसान गळून गेलें अन् ज्या हातांत मी सुरा धरला होता, तो हात ढिला पडला, तेव्हां त्या बकऱ्याला ठार मारायचें नाहीं असा मीं निश्चय केला.

दुसऱ्या दिवशीं पहांटेला माझा नोकर माझ्यापाशीं आला अन् माझ्या कानांत कुजबुजला, 'मी तुमच्यासाठीं एक चांगली बातमी आणली आहे. माझ्या मुलीला जादूच्या प्रयोगांविषयीं

थोडीशी माहिती आहे. तिनें मला सांगितलें कीं, तुमची पहिली पत्नी जादूगारीण असून तिनें तुमची दुसरी पत्नी नि मुलगा यांना जादूच्याद्वारें बकरी नि बकरा बनविलें होतें. तुम्ही बकरी मारली; पण वांचलेला बकरा हा तुमचा मुलगा आहे.'

त्या नोकराचें तें सांगणें ऐकतांच माझा आनंद अन् माझें आश्चर्य यांना पारावार उरला नाहीं! मी धांवत धांवत त्या नोकराच्या मुलीपाशीं गेलों नि तिला म्हटलें, 'तूं या बकऱ्याला त्याच्या पूर्वस्वरूपांत आणशील का? जर तूं याला पुन्हां माणूस बनविलेंस, तर तुझे उपकार मी विसरणार नाहीं!'

त्यावर ती मुलगी मला म्हणाली, 'होय, मी या बकऱ्याचा माणूस बनवीन; पण त्या बाबतींत माझ्या दोन अटी आहेत. पहिली अट अशी कीं, या बकऱ्याला मी माणूस बनविल्यावर त्याच्याशीं तुम्ही माझें लग्न लावून दिलें पाहिजे अन् माझी दुसरी अट अशी कीं, जिनें याला बकरा बनविलें आहे, त्या तुमच्या पहिल्या पत्नीला मी शिक्षा करणार!'

मी त्या मुलीच्या दोन्ही अटी कबूल केल्याच, पण शिवाय तिला बक्षिसादाखल थोडेसें द्रव्यहि देण्याचें कबूल केलें! मी त्या मुलीला सांगितलें, 'माझ्या पहिल्या पत्नीला शिक्षा होणें रास्त असलें, तरी तूं तिला ठार मारूं नकोस!'

त्या मुलीनें माझें म्हणणें मान्य केलें. तिनें एका भांड्यांत थोडें पाणी भरलें अन् तें भांडें घेऊन ती त्या बकऱ्यापाशीं गेली. त्यानंतर त्यांतलें थोडेंसें पाणी आपल्या ओंजळींत ओतून ती मंत्र पुटपुटूं लागली—

सुन सुन बकरे मेरी बात<br>
ठीक बता क्या तेरी जात।

लडका था तो लडका बन जा
जल्दी बन तू जल्दी बन ।।

नंतर त्या पाण्यावर फुंकर घालून आपल्या ओंजळींतलें तें मंतरलेलें पाणी तिनें त्या बकऱ्याच्या अंगावर शिंपडलें !



म्हणतां म्हणतां तो बकरा माझा मुलगा झाला अन् त्यानें माझ्या गळ्याला घट्ट मिठी मारली. आनंदातिशयानें माझे डोळे आंसवांनीं भरून आले !

कांहीं दिवसांनंतर मी माझ्या मुलाचें त्या मुलीबरोबर लग्न लावून दिलें. माझ्या सुनेनें माझ्या पहिल्या पत्नीलाहि शिक्षा केली ! तिनें माझ्या बिबीला हरिणी बनविलें !

जेव्हां मी माझ्या सुनेची तारीफ केली, तेव्हां ती म्हणाली, ' ही बाई फारच दुष्ट आहे ! हिला फार मोठी शिक्षा होणें इष्ट आहे, तथापि तुमच्यासाठीं म्हणून मी इतकेंच करतें कीं, ही

हरिणी दिवसां तुमचा नोकर म्हणून तुम्हीं सांगितलेलीं कामें करील अन् रात्रीं हरिणी बनेल ! दिवसां ती तुमच्या पुतण्या-सारखी दिसेल अन् सूर्य मावळतांच ती हरिणी होईल !'

तो म्हातारा वेताळाला म्हणाला, 'आहे कीं नाहीं कमाल ? किती विलक्षण कहाणी आहे ही !'

त्यानंतर तो काळे कुत्रेवाला माणूस वेताळाच्या पुढ्यांत येऊन उभा राहिला अन् वेताळाला म्हणाला, 'मी आतां माझी अन् या दोन काळच्या कुत्र्यांची कहाणी सांगतों, पण त्या कहा-णीच्या मोबदल्यादाखल तुम्ही या सौदागराची एक तृतीयांश शिक्षा कमी केली पाहिजे !'

वेताळानें संमतीदाखल आपली मान हलविली, तेव्हां त्या कुत्रेवाल्यानें कहाणी सांगायला सुरवात केली—

✦ ✦

# चार

प्राचीन काळची गोष्ट आहे ही. हे दोन्ही कुत्रे अन् मी असे तिघेहि सख्खे भाऊ होतों. आमच्या बापानें मरण्यापूर्वी बरेंच धन शिल्लक ठेवलें होतें, म्हणून त्या धनावर आम्ही तिघेहि बंधु सौदागर बनलों.

आमचा सर्वांत मोठा भाऊ व्यापारासाठीं परदेशीं गेला होता. एक वर्षानंतर जेव्हां तो परत आला, तेव्हां त्याची अवस्था अतिशय कठीण झाली होती ! त्याच्या अंगावरचे कपडे फाटून तुटून गेले होते अन् त्याच्या अंगांतली ताकदहि कमी झाली होती. तो घरीं आल्यावर मी त्याला अंघोळ घातली अन् वापरण्यासाठीं नवीं वस्त्रें दिलीं. त्यानंतर मीं त्याला व्यापारासाठीं पैसाअडका दिला अन् त्याला सांगितलें, 'तूं आतां पूर्वींची दुर्दशा विसर नि उत्साहानें व्यापार कर.'

त्यानें माझें सांगणें आनंदानें कबूल केलें अन् आम्ही तिघेहि भाऊ सुखांत राहूं लागलों. कांहीं दिवसांनंतर आपण परदेशीं जावें

नि व्यापार करावा असा माझ्या धाकट्या भावानें विचार केला. मी त्याला नको नको म्हणत असतांहि तो व्यापार करण्यासाठीं परदेशीं गेला.

एक वर्षानंतर तोहि दरिद्री बनून परत घरीं आला! त्याचा व्यापार जोरांत चालावा या हेतूनें माझ्याजवळ जो पैसा-अडका होता, त्यांतला निम्मा मीं त्याला दिला. कांहीं दिवसपर्यंत व्यापार सुरळीत चालू होता.

त्यानंतर थोड्या दिवसांनीं माझे दोघेहि भाऊ घरीं आले अन् व्यापार करण्यासाठीं आपण तिघेहि परदेशीं जाऊंया असें मला सांगूं लागले. त्या बाबतींत मी त्यांना बराच विरोध केला, पण त्यांनीं माझ्या विरोधाला दाद दिली नाहीं! अखेर निरुपाय म्हणून मीहि त्यांच्या सोबत परदेशीं जायला तयार झालों!

माझ्यापाशीं सोन्याच्या सहा हजार मोहरा होत्या. त्यांतल्या एक हजार मोहरा मी माझ्या दोघां भावांना दिल्या अन् बाकीच्या मोहरा घरांतील एका कोनाड्यांत पुरून ठेवल्या!

त्यानंतर विक्रीचा कांहीं माल बरोबर घेऊन आम्ही तिघेहि भाऊ व्यापारासाठीं परदेशीं गेलों. तिथें गेल्यावर नेलेला माल विकून टाकला. त्या व्यापारांत आम्हांला पुष्कळ नफा झाला. नंतर आम्ही तिथला माल खरेदी केला अन् तो जहाजांत भरून स्वदेशीं येण्यासाठीं गलबतांत बसलों. योग्य वेळीं आमच्या घरीं येऊन पोहोंचलों.

आम्ही तिघेहि भाऊ व्यापारासाठीं पुन्हां परदेशीं जाणार होतों, पण तितक्यांत एका सुंदर नि सुशील मुलीच्या बापानें आपल्या मुलीचें माझ्याशीं लग्न लावून दिलें. ती खरोखरच सद्-गुणी असल्याचा अनुभव मला लग्नानंतर कांहीं दिवसांनीं आला,

तथापि मी सुदैवी बनल्याचें पाहून माझे दोघेहि भाऊ माझा दुस्वास करूं लागले.

व्यापारासाठीं आम्ही तिघेहि भाऊ गलबतांतून परदेशीं जात होतों. आमच्या सोबत त्या गलबतांत माझी पत्नीहि होती. गलबत वेगानें चाललें होतें एका रात्रीं माझ्या दोघां भावांनीं मला अन् माझ्या पत्नीला उचलून गलबतांतून समुद्रांत फेंकून दिलें, त्यावेळीं माझी सुंदर पत्नी ही एक परी होती हें मला



समजलें ! मी समुद्रांत पडण्यापूर्वीं तिनें मला आपल्या हातांवर झेललें नि ती मला एका बेटांत घेऊन गेली

तिच्याविषयीं आदर दाखविण्यासाठी मी तिला म्हटलें, 'आज तूं माझा जीव वांचविण्याचें श्रेय घेंतलेंस, ही गोष्ट मी कधींहि विसरणार नाहीं ! तूं खरोखरच प्रामाणिक स्त्री आहेस.'

त्यावर माझी पत्नी लाजली अन् मला म्हणाली, 'तें माझें

कर्तव्यच होतें, तें मी पार पाडलें. असें असलें, तरी तुमच्या दोघां भावांचा मात्र मला राग आला आहे!'

त्यावर मीं तिला सांगितलें, 'तूं देवता आहेस. त्यांच्या अपराधाबद्दल तूं त्यांना क्षमा कर. आपण नेहमीं भलेपणानें वागावें.'

त्यानंतर तिनें मला सुखरूपपणें माझ्या घरीं आणलें. आम्ही दोघें सुखरूपपणें घरीं आल्याचें पहातांच आमच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांनीं आमच्याबद्दल शुभेच्छा प्रकट केल्या. मी माझें दुकान पुन्हां उघडलें अन् व्यापार सुरू केला.

एक दिवशीं हे दोन्हीं काळे कुत्रे माझ्या दुकानापाशीं आले. यांना पाहिल्यावर माझी पत्नी मला म्हणाली, 'त्यांना तुम्हीं हाकलून लावूं नका. ते दोघेहि तुमचे भाऊ असून दहा वर्षेपर्यंत ते तुमची सेवाचाकरी करणार आहेत. त्यांना त्यांच्या कर्माचें फळ मिळालें आहे!' असें म्हणून माझी पत्नी तिथल्या तिथेंच अदृश्य झाली!

आतां दहा वर्षें पुरीं झालीं असून मी माझ्या पत्नीचा शोध करण्यासाठीं इथें आलों आहें! माझी ही कहाणी आश्चर्यकारक नाहीं असें तुम्हांला वाटतें का?'

त्यावर वेताळ म्हणाला, 'खरोखर तुझी कहाणी फारच चांगली आहे.'

आपली कहाणी सांगून संपविल्यावर तो कुत्रेवाला माणूस खालीं बसतो न बसतो, तोंच लांब दाढीवाला बुटका म्हातारा उठून उभा राहिला; पण कहाणी सांगण्यापूर्वीं आपली कहाणी सांगून संपल्यावर त्या सौदागराची उरलेली एक तृतीयांश शिक्षा त्याला माफ झाली पाहिजे अशी त्यानें वेताळाला अट घातली!

वेताळ कबूल झाला, तेव्हां तिसऱ्या म्हाताऱ्यानें आपली कहाणी सांगण्यास सुरुवात केली. त्याची ती कहाणी पूर्वींच्या दोन कहाण्यांपेक्षांहि चांगली होती, त्यामुळें ती ऐकल्यावर वेताळ आश्चर्यचकित झाला.

तो म्हणाला, ‘मी सौदागराची उरलेली शिक्षा त्याला माफ केली आहे. तो आतां स्वतंत्र आहे. आतां त्याला वाटेल तिकडे त्यानें जावें. मी तुम्हां तिघांनाहि धन्यवाद देतों. जर तुम्हीं इथें आलां नसतां, तर या सौदागराचे प्राण वांचले नसते !’

असें म्हणून तो वेताळ तिथल्या तिथेंच अदृश्य झाला !

त्या सौदागरानें तिघांचेहि आभार मानल्यावर ते सारे आपापल्या मार्गानें निघून गेले.

कहाणी संपल्यावर सोनाजादी आपल्या बहिणीला म्हणाली, ‘तूं तर आज अद्‌भुत अशीच कहाणी सांगितलीस. जर तो सौदागर अन् ते तिघे म्हातारे यांनीं हिम्मत धरली नसती, तर वेताळानें त्यांना मारून टाकलें असतें !’

त्यावर चांदजादी म्हणाली, ‘यांत हिम्मत बिम्मत कांहीं नाहीं ! याच्याहिपेक्षां जास्त हिम्मत नि बहादुरी भारतांतल्या टिमकपूरच्या छोट्या राजपुत्रानें दाखविली होती. तसे हिम्मतबाज जगांत फारच थोडे असतात !’

सोनाजादी म्हणाली, ‘अजून रात्र संपलेली नाहीं. त्या हिम्मतबाज राजपुत्राची कहाणी सांग.’

बादशहाला ती कहाणी ऐकण्याची उत्कंठा लागली, म्हणून त्यानेंहि सोनाजादीच्या म्हणण्यास आपली मान्यता दर्शविली !

चांदजादीनें नवी कहाणी सांगायला सुरुवात केली–

# पांच

टिमकपूरचा राजा ऐश्वर्यसंपन्न होता. त्याच्यापाशीं सोन्या-चांदीला मुळींच कमतरता नव्हती. राजवाड्याच्या शेजारीं एक बाग होती अन् त्या बागेंत सुगंधी फुलांचीं नि सुरुचिर फळांचीं झाडें भरपूर होतीं; तथापि तो राजा नव्या नव्या झाडांच्या शोधांत असे !

एक दिवशीं रात्रीं राजाला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत त्यानें असें पाहिले कीं, समोर एक डोंगर असून त्याच्या पायथ्याशीं एक नदी वहात आहे. त्या नदीच्या प्रवाहांतून मुंडकें नसलेलें असें एक माणसाचें धड वहात चाललें आहे. नदीच्या दुसऱ्या किनाऱ्या-वर एक सुंदर बाग आहे. त्या बागेच्या दरवाजावर हातांत नागव्या तलवारी घेतलेले चार पहारेकरी उभे असून त्यांच्या हातांतल्या तलवारी रक्तानें माखलेल्या आहेत.

बागेच्या आंतल्या झाडांवर इतर कोणत्याच प्रकारचें फूल नाहीं. त्या बागेंत डाळिंबीचीं शंभर झाडें आहेत. त्यांतल्या पन्नास

झाडांवर सोन्याचीं अन् बाकीच्या पन्नास झाडांवर चांदीचीं डाळिबें लटकत आहेत. तीं डाळिबें तोडण्यासाठीं राजानें हात पुढें करतांक्षणींच एक वाघ डरकाळ्या फोडीत पुढें आला अन् तितक्यांतच झाडांच्या हिरव्यागार पानांमागें दडून बसलेले अक्राळ-विक्राळ साप फणे उभारून फूत्कार करूं लागले. फूत्कार करीत असतां त्या सापांच्या तोंडांतून आगीच्या ज्वाळा निघत होत्या. भीतीमुळें राजा किंचाळला अन् त्याचे डोळे उघडले !

दुसऱ्या दिवशीं राजानें दरबार भरविला अन् त्या दरबारांत आपल्याला आदल्या रात्रीं पडलेलें स्वप्न त्यानें दरबारी लोकांना सांगितलें.

राजा म्हणाला, 'त्या अनोळखी डाळिबांची मी किती म्हणून तारीफ करूं ? तशा प्रकारचीं डाळिबें या जगांत असणें अशक्य आहे !'

तितक्यांत एक ज्योतिषी उठून उभा राहिला अन् राजाला म्हणाला, 'महाराज, मला माफ करा; पण अशा प्रकारचीं डाळिबें या जगांत आहेतच आहेत. वाटल्यास मी त्यांचा ठाव-ठिकाणा सांगतों; पण त्या ठिकाणीं जाऊन पोहोंचणें हें अतिशय अवघड आहे !'

त्यावर राजा म्हणाला, 'मी जाईन तिथें. तुम्ही फक्त मला पत्ता सांगा. अन् तुमचा पत्ता जर खरा असला तर तुम्ही मागाल तें बक्षिस मी तुम्हाला देईन.'

ज्योतिषी म्हणाला, 'भारताच्या दक्षिण दिशेला समुद्रांत संकू नांवाचें एक बेट असून त्या बेटांत एक दानव रहात असतो. त्या दानवाची एक बाग असून, त्या बागेंतील डाळिबींच्या झाडांवरचीं डाळिबें सोन्याचांदीचीं असतात. तीं डाळिबें हस्तगत

करण्यासाठीं आतांपर्यंत कितीतरी शूरवीरांनीं प्रयत्न केले; पण ते सारेजण त्या बागेच्या रखवालदारांकडून मारले गेले! त्यासाठीं महाराज, त्या डाळिंबांचा विचार आपण आपल्या मनांतून काढून टाका!'

पण राजानें तीं डाळिंबें हस्तगत करण्याचा हट्टच धरला होता. त्यानें आपला घोडा शृंगारला नि त्याच्यावर बसून तो दक्षिण दिशेकडे निघाला.

जातां जातां त्याला वाटेंत एक कठपुतळ्यांचें दुकान लागलें. त्या दुकानांतून त्यानें दोन कठपुतळ्या विकत घेतल्या. त्या पुतळ्या लांकडी असल्या, तरी माणसाप्रमाणें हालचाल करीत असत. त्यांना चावी दिल्यावर त्या हिंडूंफिरूं लागत अन् डोळेहि मिचकावीत असत. त्यानें एका कठपुतळीच्या मानेवर मुलायम कातड्याची पिशवी बांधली अन् तिच्यांत विषारी वायु भरला. त्यानंतर तो पुढचा प्रवास करूं लागला.

तीन दिवस प्रवास केल्यानंतर राजा एका मोठ्या शहरांत जाऊन पोहोंचला. तिथें त्यानें एक औषधाची बाटली विकत घेतली. तें औषध सुवासिक होतें. औषधाची बाटली विकत घेतल्यानंतर त्यानें एका गारुड्याकडून एक पुंगीहि खरेदी केली. त्यानंतर तो संकू बेटाकडे जाण्यासाठीं निघाला. जातां जातां तो समुद्रकिनाऱ्यावर जाऊन पोहोंचला. तिथें पोहोंचल्यावर त्यानें आपला घोडा एका मच्छीमाराच्या झोंपडींत बांधला अन् त्याच्या होडींत बसून तो संकू बेटावर जाऊन उतरला.

त्या संकू बेटांत झाडेंपेडें भरपूर होतीं; तथापि पशुपक्षी किंवा माणसें यांपैकीं तिथें कुणीच दिसत नव्हतें. राजा हळू हळू त्या बागेपाशीं जाऊन पोहोंचला. तो एका झाडाआड उभा राहिला

अन् बागेच्या फाटकाकडे पाहूं लागला, तेव्हां हातांत नागव्या तलवारी घेतलेले काळ्याकुट्ट वर्णाचे चौघे पहारेकरी तिथें उभे असल्याचें त्याला दिसलें. त्या पहारेकऱ्यांच्या गळ्यांत हाडकांच्या माळा होत्या अन् त्यांचे मोठमोठे ओंठ खालीं लोंबत होते.

राजा थोडासा पुढें गेला अन् एका झाडीच्या आड लपला.

त्यानंतर तो मोठ्यानें ओरडला, 'अरे रखवालदारांनो, सावध रहा ! तुमचा काळ आला !'

त्या रखवालदारांना राग आला. ते आपल्या हातांतल्या तलवारी नाचवीत पुढें सरसावले. तें पहातांच राजानें आपल्याकडील एका कठपुतळीला चावी दिली अन् ती रखवालदारांवर सोडली. पुतळी पुढें गेल्यावर पहारेकऱ्यांच्या चार तलवारींचे तिच्यावर वार झाले. वार होतांच तिच्या अंगावरचा रबरी फुगा फसकन् फुटला. त्याच्यांतल्या विषारी वायूमुळें ते चौघेहि पहारेकरी आंधळे झाले अन् एकमेकांवर वार करतां करतांच मरून पडले !

त्यानंतर राजा बागेंत गेला. तिथें त्याला सोन्या-चांदीचीं डाळिंबें झाडांवर लटकत असलेलीं दिसलीं. तो सोन्याच्या डाळिंबापाशीं गेला न गेला, तोंच एक वाघ डरकाळ्या फोडीत तिथें आला अन् राजाच्या अंगावर झेपावणार, इतक्यांत राजानें दुसऱ्या पुतळीला चावी दिली अन् ती त्या वाघाच्या अंगावर सोडली. तो वाघ त्या पुतळीवर तुटून पडला. त्याचवेळीं त्या डाळिंबाच्या झाडावर असलेला एक भला मोठा साप फूत्कार करूं लागतांच राजानें वेळ न गमावतां पुंगी वाजवायला सुरवात केली. त्या पुंगीचा सूर ऐकतांच तो साप फणा उभारून डोलूं लागला. राजानें

ती संधि साधून सोन्याचें एक डाळिंब तोडलें अन् गुपचूप तिथून निघून गेला !

राजा होडींत बसून भारताच्या समुद्रकिनाऱ्याकडे जात होता; पण तितक्यांत तो दानव त्याच्यामागून नावेंत बसून आरडत ओरडत आला. त्याच्या डोळ्यांतून आगीच्या ज्वाळा अन् दांतांतून रक्ताच्या धारा बाहेर पडत होत्या. तो दानव जवळ आल्याचें पहातांच राजानें आपल्याजवळच्या औषधाची बाटली उघडली नि तिच्यांतलें औषध हवेंत फवारलें. त्या औषधाचा दर्प नाकांत शिरल्यावरोबर तो दानव होडींतल्या होडींतच बेशुद्ध पडला अन् राजा तें सोन्याचें डाळिंब घेऊन आपल्या राजवाड्यांत आला.

तें सोन्याचें डाळिंब राजा नेहमीं आपल्यापाशीं ठेवीत असे. एक दिवशीं तो शिकार करण्यासाठीं एका जंगलांत गेला. तिथें एका डुकराचा पाठलाग करतां करतां तो एका डोंगरावर चढला; पण तो डुकर त्याच्या नजरेंतून निसटला ! राजा विश्रांति घेण्यासाठीं एका झाडाच्या सावलींत बसला; पण तितक्यांत जवळच्या एका झाडींत तो डुकर त्याला दिसला. तेव्हां राजा त्याचा पाठलाग करूं लागला; पण पाठलाग करतां करतां राजाचा पाय घसरल्यामुळें त्याच्या खिशांतलें सोन्याचें डाळिंब खालीं पडलें अन् घरंगळत खालच्या खोल दरींत जाऊन पडलें ! खिशांतलें डाळिंब पडल्याचें पाहिल्यावर राजाला अतिशय दुःख झालें. वाटेल तो प्रयत्न करून तें डाळिंब आपण परत मिळवायचें असा राजानें मनांत निश्चय केला अन् तो डोंगरावरून खालच्या दरींत मोठ्या कष्टानें उतरला. खालीं उतरतांना त्याच्या अंगावरचे कपडे फाटले, ठेंचा लागून पाय रक्तबंबाळ झाले, तरी त्याची पर्वा न

करतां तो दरींत उतरला. खालीं उतरल्यानंतर एका दगडाच्या आड त्याला सोन्यासारखी चकचकीत अशी कसलीतरी वस्तु दिसली ! म्हणतांक्षणींच राजाला अतिशय आनंद झाला. त्यानें धांवत जाऊन ती वस्तु उचलली; पण हाय ! तो कमनशिबी ठरला ! त्यानें जी वस्तु उचलली होती, तें सोन्याचें डाळिंब नसून सोन्यासारखा चकाकणारा असा एक वाटोळा दगड होता !

राजाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. तो डाळिंबाच्या शोधासाठीं पुढें जाऊं लागला; पण तितक्यांत जवळच्या झाडींतून कुणाच्यातरी हंसण्याचा आवाज त्याला ऐकू आला ! 'या निर्जन जागेंत कोण हंसत आहे ?' असा मनांत विचार करीत राजा तिथेंच उभा राहिला. थोड्याच वेळांत त्या झाडींतून तो डुक्कर बाहेर आला !

'अरे देवा, ही काय भानगड आहे ?' राजा मनांत म्हणाला.

त्या डुकरानें आपलें मुंडकें जमिनींत खुपसलें मात्र, लगेच जमिनींतून धुरळा उडाला; पण त्याच वेळीं तो डुक्कर अदृश्य होऊन त्याच्या जागीं हातांत धनुष्यबाण घेतलेला अन् अंगावर शुभ्र वस्त्रें असलेला एक माणूस प्रकट झाला !

राजा भीतीमुळें थरथर कांपूं लागला. त्यानें हात जोडले, तेव्हां तो माणूस म्हणाला, 'मोठा राजा दिसतोस ! शिकारी-साठीं आला होतास ? आणखीन कर शिकार !' असें म्हणून तो माणूस खदखदां हंसूं लागला ! तशाच प्रकारचें हंसणें राजानें थोड्या वेळापूर्वीं ऐकलें होतें, त्यामुळें आपण कोणत्यातरी माया-जालांत फसलों आहें असें त्याला वाटलें !

राजा म्हणाला, 'मला माफ कर. मी इथें याउपर कधीहि येणार नाहीं शिकारीला. माझ्यावर दया दाखव.'



शुभ्रवस्त्रधारी माणूस म्हणाला, 'तूं टिमकपूरचा राजा आहेस; पण माझ्या सीमेंत येण्याचा तुला मुळींच अधिकार नाहीं. मी या डोंगराचा यक्ष आहें. माझ्या मान्यतेशिवाय इथें कुणालाहि येतां येणार नाहीं. तूं माझ्या अनुज्ञेशिवाय इथें आल्यामुळें तुला शिक्षा होणें जरूर आहे. मी तुला ठार मारणार!'

राजा विनवणी करूं लागला, 'मला मारूं नकोस!'

त्यावर यक्ष म्हणाला, 'मी तुला एकाच अटीवर सोडीन. तो तिथें सोन्याचा एक चेंडू पडला आहे, तो तूं मला दे. मी तो माझ्या मुलाला खेळायला देणार!'

राजा म्हणाला, 'तो चेंडू नसून सोन्याचें डाळिंब आहे.'

यक्ष म्हणाला, 'तें डाळिंब असो किंवा तो पेरू असो, मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. माझा मुलगा खेळणार त्याच्याशीं. हो, पण मी तुला इतकीच सवलत देईन. त्या डाळिंबांतला एक

दाणा मी तुला देईन. तो तूं रुजत घातलास कीं तुला पुष्कळ फळें मिळतील.'

'जीव आहे तर जग आहे.' असा राजानें मनांत विचार केला अन् तो डाळिंबाचा एक दाणा घ्यायला तयार झाला! नंतर त्या यक्षानें तें डाळिंब वर उचललें अन् बाणाच्या टोंकानें आंतला एक दाणा काढून तो राजाच्या हातावर ठेवला.

तो दाणा घेऊन राजा टिमकपूरला आल्यावर त्यानें तो दाणा आपल्या बागेंत रुजत घातला. कांहीं महिन्यांनीं झाड तयार झालें. त्याच्यावर तांबडीं लाल फुलें नि सोनेरी फळें दिसूं लागलीं; पण तीं फळें चोरीला जात असल्याचें बागेच्या रखवालदारांना दिसलें. राजाला फार वाईट वाटलें!

राजानें बागेच्या रक्षणासाठीं कसलेले पहारेकरी बसविले; पण फळांची चोरी थांबली नाहीं!

इतक्यांत सूर्य उगवला, म्हणून चांदजादीनें आपली कहाणी अर्ध्यावरच थांबविली. बादशहाला ती कहाणी पसंत पडली होती अन् त्याला ती पुरी ऐकायची होती, म्हणून त्यानें चांदजादीला त्या दिवसापुरतें जीवदान दिलें!

✦ ✦

# सहा

दुसऱ्या दिवशीं पहांटेला चांदजादीनें पुढची कहाणी सांगायला सुरुवात केली–

राजाला दुःख झाल्याचें पाहिल्यावर त्याचा थोरला मुलगा त्याला म्हणाला, ' बाबा, आज रात्रीं त्या बागेंत मी पहारा करतों अन् त्या चोराला पकडून तुमच्यापुढें उभा करतों. '

त्यावर राजा त्याला म्हणाला, ' तूं त्या चोराला पकडशील अशी माझी खात्री आहे. त्यासाठीं तुला ज्या ज्या साधनांची गरज असेल, तीं तीं साधनें बरोबर घेऊन जा जातांना. '

अशा प्रकारें राजाची अनुज्ञा मिळाल्यानंतर त्या रात्रीं त्या राजाचा थोरला मुलगा बागेच्या रक्षणासाठीं निघून गेला. जातांना त्यानें भाला नि तलवार हीं दोन आयुधें आपल्यावरोबर घेतलींच, पण त्याशिवाय चोराला बांधण्यासाठीं लागणारी दोरीहि त्यानें आपल्या पिशवींत भरून नेली.

मध्यरात्र झाली. किल्ल्यांतल्या राजवाड्याच्या देवडीवर

बारा टोले पडले अन् बागेंत घुंगुरांचा आवाज ऐकूं येऊं लागला !

कुणीतरी नाचत होतें त्या बागेंत. तो आवाज कानीं पडतांच राजपुत्र तलवार सरसावून उभा राहिला. आस्ते आस्ते आवाज जवळ जवळ येऊं लागला. फारच मधुर आवाज होता तो. तशा प्रकारचा आवाज त्या राजपुत्रानें कधींच ऐकला नव्हता. राजपुत्र तो आवाज लक्षपूर्वक ऐकूं लागला. ऐकतां ऐकतां त्याला गुंगी आली अन् त्या गुंगींतच त्याला गाढ झोंप लागली !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जागा झाला. त्यानें हातांतली तलवार सावरली अन् तो झाडावरच्या डाळिंबाकडे पाहूं लागला, पण तें सोन्याचें डाळिंब तिथून केव्हांच नाहींसें झालें होतें ! राजपुत्राला अतिशय वाईट वाटलें ! तो राजाला काय उत्तर देणार ?

राजानें दुसऱ्या दिवशीं आपल्या मधल्या मुलाला डाळिंबाच्या रक्षणासाठीं पाठविलें; पण त्यालाहि त्या सोन्याच्या डाळिंबाचें रक्षण करतां आलें नाहीं ! पहिल्या दिवसाप्रमाणेंच त्या दिवशींच्या मध्यरात्रीं तें सोन्याचें डाळिंब चोरीला गेलें. रोज सकाळीं सोनेरी डाळिंब झाडावर दिसे अन् मध्यरात्रीं तें चोरीला जात असे ! अशा प्रकारें पहिल्या सहा राजपुत्रांनीं चोरीचा छडा लावण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना यश न आल्यामुळें शेवटच्या सातव्या राजपुत्रानें चोराला पकडण्याचा विडा उचलला.

त्या रात्रीं सर्वांत धाकटा राजपुत्र हातांत तलवार घेऊन त्या सोन्याच्या डाळिंबाचें रक्षण करण्यासाठीं झाडाखालीं बसला. हळूहळू मध्यरात्र झाली. राजवाड्यांत देवडीवर बारा टोले पडले अन् त्याचवेळीं त्या राजपुत्राला घुंगुरांचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो राजपुत्र सावधगिरीनें जागच्या जागीं बसला. त्यापूर्वीं त्यानें आपल्या डाव्या हाताची करंगळी तलवारीनें छाटून टाकली ! त्या

करंगळींतून भळभळां रक्त वाहूं लागलें अन् त्याला वेदनाहि होऊं लागल्या ! घुंगुरांचा आवाज जवळ जवळ येऊं लागला; पण त्या राजपुत्राला होत असलेल्या वेदनांमुळें त्याला झोंप आली नाहीं !

थोडचाच वेळांत तिथें एक सफेत घोडा येऊन उभा राहिला, त्याबरोबर राजपुत्र तलवार सरसावून त्या घोडचाच्या अंगावर धांवला !

त्यावर तो घोडा मनुष्यवाणीनें राजपुत्राला म्हणाला, ' मला मारूं नकोस. मी तुला माझ्या शेपटीचा एक केंस देतों. तो केंस तूं जाळलास कीं तुझ्या मनांतली इच्छा पुरी होईल !'

राजपुत्रानें त्या घोडचाला सोडून दिलें अन् त्याच्या शेपटीचा एक केंस आपल्यापाशीं ठेवला. त्यानंतर क्रमाक्रमानें सहा घोडे त्या ठिकाणीं आले. राजपुत्रानें त्या सर्वांना तिथें अडविलें अन् त्या प्रत्येकानें त्याला आपल्या शेपटीचा एकेक करामती केंस दिला !

जेव्हां रात्र संपली, तेव्हां तो राजपुत्र त्या सात घोडयांनीं दिलेले सात केंस घेऊन राजापाशीं गेला अन् त्याला म्हणाला, ' बाबा, मी त्या सोन्याचें डाळिंबाचें रक्षण केलें आहे. वाटल्यास तुम्ही त्या बागेंत जा अन् तें डाळिंब झाडावर आहे कीं नाहीं तें पहा !'

आपल्या धाकटया मुलाचा पराक्रम पाहून राजा फार खूष झाला अन् त्यानें त्याला आपल्या राज्याचा मालक बनविलें; पण ही गोष्ट त्याच्या इतर भावांना आवडली नाहीं ! आतां आपण इथें रहाण्यांत अर्थ नाहीं असें त्या सहाहि भावांना वाटलें, म्हणून ते टिमकपूर सोडून परदेशीं निघून गेले.

जिथें माझे थोरले बंधु रहातील, तिथेंच मी राहीन असा धाकटया राजपुत्रानें मनांत विचार केला अन् तो त्यांच्यामागून

बारा टोले पडले अन् बागेंत घुंगुरांचा आवाज ऐकूं येऊं लागला!

कुणीतरी नाचत होतें त्या बागेंत. तो आवाज कानीं पडतांच राजपुत्र तलवार सरसावून उभा राहिला. आस्ते आस्ते आवाज जवळ जवळ येऊं लागला. फारच मधुर आवाज होता तो. तशा प्रकारचा आवाज त्या राजपुत्रानें कधींच ऐकला नव्हता. राजपुत्र तो आवाज लक्षपूर्वक ऐकूं लागला. ऐकतां ऐकतां त्याला गुंगी आली अन् त्या गुंगींतच त्याला गाढ झोंप लागली!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो जागा झाला. त्यानें हातांतली तलवार सावरली अन् तो झाडावरच्या डाळिंबाकडे पाहूं लागला, पण तें सोन्याचें डाळिंब तिथून केव्हांच नाहींसें झालें होतें! राजपुत्राला अतिशय वाईट वाटलें! तो राजाला काय उत्तर देणार?

राजानें दुसऱ्या दिवशीं आपल्या मधल्या मुलाला डाळिंबाच्या रक्षणासाठीं पाठविलें; पण त्यालाहि त्या सोन्याच्या डाळिंबाचें रक्षण करतां आलें नाहीं! पहिल्या दिवसाप्रमाणेंच त्या दिवशींच्या मध्यरात्रीं तें सोन्याचें डाळिंब चोरीला गेलें. रोज सकाळीं सोनेरी डाळिंब झाडावर दिसे अन् मध्यरात्रीं तें चोरीला जात असे! अशा प्रकारें पहिल्या सहा राजपुत्रांनीं चोरीचा छडा लावण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना यश न आल्यामुळें शेवटच्या सातव्या राजपुत्रानें चोराला पकडण्याचा विडा उचलला.

त्या रात्रीं सर्वांत धाकटा राजपुत्र हातांत तलवार घेऊन त्या सोन्याच्या डाळिंबाचें रक्षण करण्यासाठीं झाडाखालीं बसला. हळूहळू मध्यरात्र झाली. राजवाड्यांत देवडीवर बारा टोले पडले अन् त्याचवेळीं त्या राजपुत्राला घुंगुरांचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो राजपुत्र सावधगिरीनें जागच्या जागीं बसला. त्यापूर्वीं त्यानें आपल्या डाव्या हाताची करंगळी तलवारीनें छाटून टाकली! त्या

करंगळींतून भळभळां रक्त वाहूं लागलें अन् त्याला वेदनाहि होऊं लागल्या ! घुंगुरांचा आवाज जवळ जवळ येऊं लागला; पण त्या राजपुत्राला होत असलेल्या वेदनांमुळें त्याला झोंप आली नाहीं !

थोड्याच वेळांत तिथें एक सफेत घोडा येऊन उभा राहिला, त्यावरोबर राजपुत्र तलवार सरसावून त्या घोड्याच्या अंगावर धांवला !

त्यावर तो घोडा मनुष्यवाणीनें राजपुत्राला म्हणाला, 'मला मारूं नकोस. मी तुला माझ्या शेपटीचा एक केंस देतों. तो केंस तूं जाळलास कीं तुझ्या मनांतली इच्छा पुरी होईल !'

राजपुत्रानें त्या घोड्याला सोडून दिलें अन् त्याच्या शेपटीचा एक केंस आपल्यापाशीं ठेवला. त्यानंतर क्रमाक्रमानें सहा घोडे त्या ठिकाणीं आले. राजपुत्रानें त्या सर्वांना तिथें अडविलें अन् त्या प्रत्येकानें त्याला आपल्या शेपटीचा एकेक करामती केंस दिला !

जेव्हां रात्र संपली, तेव्हां तो राजपुत्र त्या सात घोड्यांनीं दिलेले सात केंस घेऊन राजापाशीं गेला अन् त्याला म्हणाला, 'बाबा, मी त्या सोन्याचें डाळिंबाचें रक्षण केलें आहे. वाटल्यास तुम्ही त्या बागेंत जा अन् तें डाळिंब झाडावर आहे कीं नाहीं तें पहा !'

आपल्या धाकट्या मुलाचा पराक्रम पाहून राजा फार खूष झाला अन् त्यानें त्याला आपल्या राज्याचा मालक बनविलें; पण ही गोष्ट त्याच्या इतर भावांना आवडली नाहीं ! आतां आपण इथें रहाण्यांत अर्थ नाहीं असें त्या सहाहि भावांना वाटलें, म्हणून ते टिमकपूर सोडून परदेशीं निघून गेले.

जिथें माझे थोरले बंधु रहातील, तिथेंच मी राहीन असा धाकट्या राजपुत्रानें मनांत विचार केला अन् तो त्यांच्यामागून

चालूं लागला. धाकटा भाऊ आपल्यामागून येत असल्याचें पाहिल्या-वर त्याच्या थोरल्या सहाहि भावांना नवल वाटलें अन् राज्याचा अधिकार मिळाल्यावरहि ज्याअर्थीं तो आमच्या मागून येत आहे, त्याअर्थीं त्याच्या मनांत आमच्याविषयीं कांहींतरी काळेंबेरें असलें पाहिजे असा विचार करून त्यांनीं त्याला एका विहिरींत ढकललें.

त्या विहिरींत पाणी नव्हतें. तळाशीं फक्त दगड होते. त्या दगडांवर त्या राजपुत्राचा पाय आपटल्यामुळें त्याच्या पायाला जखम झाली अन् तशाच अवस्थेंत तो तिथें निपचित पडून राहिला. कांहीं वेळानें पायाच्या वेदना थांबल्यावर तो वर उठला, तेव्हां त्या विहिरींतली एक वीट ढांसळली असल्याचें त्याला दिसलें.



त्यानें त्या झरोक्यांतून आंत पाहिलें, तेव्हां त्याला आंत प्रकाश दिसला. म्हणतांक्षणींच त्यानें आणखीन चारदोन विटा ओढून काढल्या, तेव्हां आंतल्या बाजूला पायऱ्या असल्याचें त्याला दिसलें.

तो गुपचुप पायऱ्या उतरूं लागला. समोर हिरवळ असलेलें मैदान होतें अन् त्या मैदानांत फुलझाडें लावलीं होतीं. राजपुत्र जरासा पुढें गेला, तेव्हां त्याला एक घर दिसलें त्याला अतिशय भूक लागली होती, म्हणून तो त्या घरांत शिरला. आंतल्या भागांत रंगीबेरंगी गाद्या पसरल्या होत्या अन् भिंतींवर भीतिदायक चित्रें रंगविलीं होतीं. त्या दालनाच्या मागें एक खोली होती अन् त्या खोलीला बाहेरून कडी लावलेली होती. राजपुत्रानें ती कडी काढून दारें उघडतांच भीतीनें त्याच्या अंगावर कांटा उभा राहिला! तिथें एक मुलगी पलंगावर पडलेली होती अन् तिचें तुटलेलें शिर बाजूला पडलें होतें!

राजपुत्र मनांत म्हणाला, 'आज माझ्यावर कोणतें तरी संकट येणार!' तितक्यांत जवळच पडलेल्या दोन बांसऱ्यांकडे राजपुत्राची नजर गेली. त्या दोन बांसऱ्यांपैकीं एक बांसरी सोन्याची होती अन् दुसरी बांसरी चांदीची होती. राजपुत्रानें त्या दोन्ही बांसऱ्या उचलून हातांत घेतल्या. त्या बांसऱ्यांचा एकमेकींशीं मिलाफ होतांक्षणींच ती मुलगी जिवंत झाली अन् उठून उभी राहिली! त्यानंतर ती प्रथम खदखदां हंसली नि मागाहून ओक्साबोक्शीं रडूं लागली.

राजपुत्रानें तिला विचारलें, 'तूं कोण आहेस? कुठून आलीस? आरंभीं हंसलीस कां? अन् आतां रडतेस कां?'

त्यावर ती मुलगी म्हणाली, 'मी पांचू राक्षसाची मुलगी आहें. हें घर आमचें आहे. जेव्हां माझा बाप बाहेर जातो, तेव्हां तो माझा गळा कापतो. त्यानंतर माझें मुंडकें नि धड हीं अलग अलग ठेवतो. तो बाहेरून परत आल्यावर या दोन्ही बांसऱ्या एकमेकींना जोडतो. त्यानें तसें केल्यावर मी जिवंत होतें. तुम्ही

मला जिवंत केल्यामुळे मी हंसलें अन् बाहेर गेलेला माझा बाप आतां येणार नि त्यानंतर तो तुम्हांला ठार मारणार म्हणून मी रडत होतें !'

थोड्याच वेळांत त्या मुलीला राक्षस येत असल्याची चाहूल लागली, त्याबरोबर तिनें लहान रूप घेतलें अन् खिडकीच्या गजांतून बाहेर गेल्यावर खोलीच्या दरवाजांना पूर्वी होती तशी कडी लावली अन् आंत आल्यावर तिनें राजपुत्राला उंदीर बनवून आपल्या पलंगाखालीं लपवून ठेवलें. त्यानंतर ती पलंगावर आडवी पडली अन् तिनें तल्वारीनें आपला गळा कापला.

राक्षस आंत आला. त्यानें दोन्ही वांसऱ्या एकमेकींना जोडून आपल्या मुलीला जिवंत केलें नि तो तिला म्हणाला, 'इथें मला माणसाचा वास येतो आहे. कुणी माणूस तर आला नाहीं ना ?'

उत्तरादाखल ती मुलगी त्याला म्हणाली, 'तुम्ही रोज माणसें मारून खातां, त्यामुळें त्यांचा वास आला असेल तुम्हांला; पण तुमच्या भीतीमुळें इथें कुणीहि माणूस येणें शक्य नाहीं.'

दुसऱ्या दिवशीं त्या राक्षसानें आपल्या मुलीचें मुंडकें मारलें, दोन्ही वांसऱ्या अलग अलग ठेवल्या अन् आपण बाहेर निघून गेला. राक्षस बाहेर गेल्याबरोबर पलंगाखालीं लपलेला उंदीर बाहेर आला अन् त्यानें दोन्ही बांसऱ्यांचा मिलाफ घडविला ! ती मुलगी उठून उभी राहिली अन् तिनें मंत्राच्याद्वारें त्या उंदराचें राजपुत्रांत रूपांतर केलें.

राजपुत्र राक्षसकन्येला म्हणाला, 'जर तुझ्या बापाला बाहेर कुणीतरी ठार मारलें, तर तूं इथें मेलेल्या अवस्थेंत रहाणार नि नंतर तुझें हें शरीर सडून कुजून जाणार !'

त्यावर राक्षसकन्या म्हणाली, 'तसें होणें कधींहि शक्य नाहीं ! माझ्या बापाचें मरण त्या पोपटावर अवलंबून आहे अन् तो पोपट पिंजऱ्यांत असून त्याच्याभोंवतीं सापांविंचवांचा पहारा आहे.'

त्याबरोबर राजपुत्रानें आपल्यापाशीं असलेला घोड्याचा एक केंस जाळला अन् म्हणाला, 'मला तो पोपटाचा पिंजरा पाहिजे.'

राजपुत्रानें तसें म्हणतांक्षणींच अस्मानांतून एक हात खालीं आला अन् त्या हातानें तो पोपटाचा पिंजरा राजपुत्राच्या हातीं दिला पिंजरा राजपुत्राच्या हातांत आल्याबरोबर पिंजऱ्यांतला पोपट फडफडूं लागला अन् तिकडे तो राक्षस घरीं येण्यासाठीं धडपडूं लागला; पण तितक्यांत राजपुत्रानें त्या पोपटाचा एक पाय मोडल्याबरोबर तिकडे तो राक्षस लंगडा झाला अन् राजपुत्रानें त्या पोपटाचा दुसरा पाय मोडल्याबरोबर तो राक्षस लोळागोळा होऊन पडला! तशाहि स्थितींत तो घराच्या दरवाजापर्यंत आला; पण राजपुत्रानें त्या पोपटाची मान मुरगळतांच तो राक्षस मरून पडला !

सूर्योदय झाल्यामुळें चांदजादीनें ती कहाणी तिथेंच संपविली.

## सात

दुसऱ्या दिवशीं पहांटेस सोनाजादी चांदजादीला म्हणाली, 'त्या राजपुत्रानें पुढें काय केलें तें ऐकायची माझी इच्छा आहे. त्यासाठीं पुढची गोष्ट आतां सांग.'

चांदजादीनें पुढची कहाणी सांगायला सुरुवात केली—

त्या राजपुत्राला आतां कसलेंच भय नव्हतें. तो राक्षस-कन्येला म्हणाला, 'तुझ्याशीं लग्न करायची माझी इच्छा आहे अन् तूं म्हणत असशील, तर दोन महिन्यांनंतर मी तुला इथन घेऊन जाईन.'

राक्षसकन्येनें होकार दिल्यावर राजपुत्रानें तिचा निरोप घेतला अन् तो पुढच्या प्रवासासाठीं तिथून निघून गेला.

सुमारें पन्नास मैल चालून गेल्यावर तो दुसऱ्या एका राज्यांत जाऊन पोहोंचला. तिथल्या किल्ल्यापाशीं एक मोठा तुरुंग होता अन् त्या तुरुंगाच्या प्रवेशद्वाराशीं लोकांची गर्दी जमली होती. तो राजपुत्र त्या गर्दीत शिरला गर्दींतले सारे लोक त्या नव्या कैद्यां-

कडे पहात होते. ते कैदी कुणी सामान्य नव्हते. त्यांचे कपडे भरजरी होते अन् त्यांच्या गळयांत हिऱ्यांमोत्यांचे हार होते.

राजपुत्रानें त्या कैद्यांना ओळखलें. ते त्याचे भाऊ होते. त्यांच्या पायांत बेडया होत्या अन् हातांत हातकडया होत्या. आपल्या भावांची अगतिक अवस्था पाहिल्यावर त्या राजपुत्राचें मन कळवळलें. तो त्यांच्यापाशीं गेला अन् त्यानें त्यांना विचारलें, ' तुम्हांला कैद करण्याचें कारण कोणतें ? तुम्ही कोणता गुन्हा केला आहे ? मला सारी हकीकत सांगा. '

तेव्हां सर्वांत थोरला भाऊ त्याला म्हणाला, ' आम्ही विनाकारण फसलों आहोंत. या शहरांत रोज चोरी होत असते. शिपायांनीं बरेच प्रयत्न केले; पण त्यांना चोर सांपडणें कठीण झालें. तेव्हां शहरांतल्या प्रमुख अधिकाऱ्यानें जाहीर केलें कीं, जो कुणी चोरांना पकडील, त्याला मोठें बक्षीस दिलें जाईल; पण चोरांना पकडूं पहाणाऱ्या इसमानें प्रथम या शहराच्या प्रमुख अधिकाऱ्याकडे आपले नांव नोंदविलें पाहिजे. त्याच्याकडून जर चोर पकडला गेला नाहीं, तर त्यानें एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा भोगली पाहिजे ! आम्ही सर्वांनीं चोर पकडण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले; पण आमचे ते प्रयत्न फुकट गेल्यामुळें आतां आम्ही कारागृहांत पडलों आहोंत. '

त्यावर राजपुत्र म्हणाला, ' ही तर क्षुल्लक बाब आहे. मी त्या चोरांना पकडतों अन् तुम्हांला कैदेंतून सोडवितों. '

तो धाकटा राजपुत्र शहराच्या प्रमुख अधिकाऱ्याकडे गेला अन् त्याला म्हणाला, ' त्या चोरांना पकडण्याची माझी इच्छा आहे. माझें नांव लिहून घ्या, पण त्या चोरांना पकडण्यासाठीं त्यापूर्वी मला एक हजार मजुरांची मदत लागेल, तेवढी तुम्ही द्या. '

त्या अधिकाऱ्यानें राजपुत्राला एक हजार मजूर दिले. त्या राजपुत्रानें मजुरांकडून शहराच्या चारी बाजूंना मजबूत भिंत बांधविली, पण त्या भिंतीला फक्त एकच दरवाजा ठेवला. त्यानें तो दरवाजा उघडा ठेवला अन् आपण रात्रीच्या वेळीं त्या दरवाजापाशीं बसला. त्यानें आपल्यापाशीं कांहीं दोरखंडेंहि ठेवलीं होतीं !

मध्यरात्र उलटून गेल्यावर एक सावलीसारखी दिसणारी आकृति हळूहळू दरवाजाच्या दिशेनें येत असल्याचें पाहिल्यावर तो राजपुत्र सावधगिरीनें बसला. आस्ते आस्ते ती छाया स्पष्ट दिसूं लागली. एक माणूस होता तो अन् त्यानें काळा बुरखा पांघरला होता. तो माणूस दरवाजांतून आंत शिरतांच राजपुत्रानें आपल्याजवळील दोरीचा फांस त्याच्या गळ्यांत टाकला ! त्या चोरानें पळून जाण्यासाठीं बरीच धडपड केली, पण त्याची ती धडपड फुकट गेली ! राजपुत्रानें त्याच्या मुसक्या बांधल्या अन् त्याला एका बाजूस ठेवून दिलें !

त्यानंतर उजाडेपर्यंत आणखीन चार चोर आले. राजपुत्रानें त्या सर्वांच्या मुसक्या बांधल्या. सकाळीं तो अधिकारी बागेंत आल्यावर राजपुत्रानें त्या पांचहि चोरांना त्याच्या ताब्यांत दिलें.

राजपुत्राचें तें धाडस पाहून तो अधिकारी फारच खूष झाला अन् राजपुत्राला म्हणाला, ‘ तुझी काय इच्छा आहे ? तुझी जी इच्छा असेल ती मी पुरी करीन. ’

राजपुत्र म्हणाला, ‘ परवां जे सहा कदी तुरुंगांत ठेवले आहेत, त्या सर्वांची सुटका करा ! ’

अधिकारी म्हणाला, ‘ ठीक आहे. त्या सहाहि कैद्यांची आतां सुटका केली जाईल, पण तूं स्वतःसाठीं कांहींच मागितलें

नाहींस ! असें असलें, तरी मी माझ्या इच्छेनें तुला इथली फुलबाग बक्षीस देत आहें '

त्यानंतर ते सातहि भाऊ आनंदानें आपल्या राज्यांत जाण्यासाठीं तिथून निघाले.

जातां जातां रात्र झाली, म्हणून ते एका धर्मशाळेंत उतरले. त्या धर्मशाळेच्या मालकिणीनें तिथें खाणावळ चालविली होती. ते सातहि राजपुत्र तिथें जाऊन पोहोंचल्यावर सर्वांत थोरला राजपुत्र खाणावळवालीच्या कानांत कुजबुजला, ' हें पहा मालकीणबाई, आम्हां सातांपैकीं सहाजण राजपुत्र आहोंत अन् सर्वांत धाकटा पोरगा हा आमचा नोकर आहे. तो तुमच्या कामधंद्यांत तुम्हांला मदत करील. तुम्ही त्याला थोडेंसें सुखेंरुखें कांहींतरी खायला द्या अन् त्याच्याकडून भरपूर काम करून घ्या !'

हवें होतें रोगाला तें मिळालें वैद्याला ! ती खाणावळवाली काकू त्या धाकट्या राजपुत्राला लगेच म्हणाली, ' ए पोरा, त्या सहाहि खोल्या झाडून स्वच्छ कर अन् त्यांच्यांत खाटा मांडून त्यांवर बिछाने पसर. तूं तिकडे त्या पडवींत झोंप.'

त्यावर धाकटा राजपुत्र म्हणाला, ' त्या पडवींत मला थंडी वाजेल. मला एक लहानशी खोली द्या.'

खाणावळवाली म्हणाली, ' वा रे वा ! तुझी मिजास मोठी राजपुत्रासारखी दिसते ! राजपुत्रांच्या सहवासांत राहिल्यामुळें तूं आपला दर्जा विसरलास वाटतें ! चल झटपट, त्या खोल्या साफ कर. मला स्वयंपाक करायचा आहे.'

धाकट्या राजपुत्रानें सहाहि खोल्या झाडल्या, खाटा मांडल्या अन् त्यावर बिछानेहि पसरले. त्यानंतर तो स्वयंपाकघरांत गेला अन् तिथलीं भांडींकुंडीं साफसूफ करूं लागला.

जवळच्या खोलींत सहाहि राजपुत्र गप्पा लाटीत बसले होते. तितक्यांत ती खाणावळवाली त्या राजपुत्रांपाशीं गेली अन् त्यांना म्हणाली, ‘ इथल्या राजानें आपल्या किल्ल्यांत एक लोखंडी उंच खांब उभा केला असून त्याच्या टोंकावर एक खरबूज ठेवलें आहे. जो कोणी बाणानें तें खरबूज छेदील अन् तो बाण परत आपल्याकडे आणील, त्याला आपण आपलें अर्धे राज्य देईन असा त्यानें पण केला आहे. ’

तिचें तें सांगणें ऐकतांच ते सहाहि राजपुत्र फार खूष झाले. ते तो पण जिंकण्यासाठीं निघून गेले. त्यांनीं बाजारांतून चांगलीं धनुष्यें नि चांगले बाण विकत घेतल्यावर ते किल्ल्यांत गेले.

त्यांनीं कांहीं बाण मारले अन् खरबुजेंहि उडविलीं, पण त्यांनीं मारलेले बाण त्यांच्याकडे परत आले नाहींत, त्यामुळें ते हिरमुसले होऊन पुन्हां खाणावळींत आले !

दुसऱ्या दिवशीं ते सहाहि राजपुत्र शहरांत सहल करण्यासाठीं निघून गेले. सर्वांत धाकट्या राजपुत्रानें खाणावळींतलें आपलें काम पुरें केल्यावर तो मालकिणीला म्हणाला, ‘ आतां मीहि थोडा वेळ शहरांत फिरून येतों. ’

त्यावर मालकीण म्हणाली, ‘ मी तुला इथून बाहेर जाऊं देणार नाहीं. तुला इथें अडकवून ठेवण्यासाठीं त्या राजपुत्रांनीं मला एक मोहर दिली आहे ’

धाकटा राजपुत्र म्हणाला, ‘ मग मी दोन मोहरा देतों. मला बाहेर जाऊं दे. ’

मालकिणीनें त्याच्याकडून दोन मोहरा घेतल्या अन् त्याला बाहेर जाऊं दिलें. बाहेर गेल्यावर त्यानें आपल्याजवळ असलेल्या घोड्याच्या शेपटीचा एक केंस जाळला अन् धनुष्य–बाण मागितलीं.

केंस जळतांच थोडासा धूर निर्माण झाला अन् त्या धुरांतून बाहेर आलेल्या हातानें त्याला धनुष्य अन् बाण हीं दिलीं.

त्यानें तीं घेतलीं अन् तो तडक किल्ल्यांत गेला. तिथें त्या राज्याचा राजा बसला होता. राजपुत्रानें त्याला आपला हेतु सांगितला.

राजा म्हणाला, 'तूं अजून छोटा आहेस. तुला हें काम जमायचें नाहीं !'

त्यावर राजपुत्र म्हणाला, 'मी छोटा असलों, तरी माझ्या करामती मोठ्या आहेत. विश्वास वाटत नसल्यास आत्तांच अनुभव घेऊन पहा !'

असें म्हणून त्यानें धनुष्याला बाण जोडला नि नेम धरून तो खांबावरच्या खरबुजावर सोडला. खरबुजाचीं दोन छकलें झालीं अन् त्यानें सोडलेला तीरहि परत त्याच्या हातीं येऊन पडला !

राजाला अतिशय आनंद झाला. त्यानें त्याच्या गळ्याला मिठी मारली अन् त्यानंतर त्या राजपुत्राची वाजत गाजत मिरवणूक काढली !

एका लहानशा राजपुत्रानें तो पण पुरा केला आहे असें त्या सहाहि राजपुत्रांस समजल्यावर ते त्याला पहाण्यासाठीं गेले. ती मिरवणूक जवळ आल्यावर ते हतबुद्धच झाले ! तो आपला सर्वांत धाकटा भाऊ असल्याचें त्यांनीं ओळखलें; पण ते त्याच्या बाबतींत मनांत जळफळूं लागले ! धाकट्या राजपुत्रानें त्यांना पहातांच हात जोडून प्रणाम केला ! अखेर ते सातहि राजपुत्र आपल्या राज्यांत परत गेल्यावर सर्वांत धाकट्या राजपुत्रानें

राक्षसकन्येशीं लग्न लावलें. त्यानंतर ते सातहि राजपुत्र एकोप्यानें वागूं लागले.

सूर्योदय झाला, म्हणून चांदजादीनें ती कहाणी तिथेंच संपविली !

तेव्हां बादशहा म्हणाला, 'चांदजादी, तुझें कहाण्या सांगण्याचें कौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखें आहे हं ! खरोखर तुझ्या कहाण्यांमुळें माझें जीवन दिवसेंदिवस बदलत चाललें आहे !'

त्यावर चांदजादी म्हणाली, 'माझी तेवढी पात्रता नाहीं हुजूर; पण अशा प्रकारें आपली मेहरबानी असेल, तर मी उद्यां आपल्याला हिच्याहिपेक्षां सुंदर कहाणी सांगेन !'

✦ ✦

# आठ

दुसऱ्या दिवशीं पहांटेला चांदजादीनें नवी कहाणी सांगायला सुरवात केली—

लंकेंतल्या एका गांवांत एक शेतकरी रहात होता. त्या शेतकऱ्याची बायको खरोखरच काबाडकष्टी होती. तिचा नवरा शेतावर कामाला गेल्यावर ती नदीकांठीं जाई नि शिंपा जमा करी. त्या घरीं आणल्यावर त्यांच्यापासून सुंदर दागिने तयार करी अन् ते बाजारांत नेऊन विकी.

एक दिवशीं ती नेहमींप्रमाणें शिंपा जमा करीत होती. तिची पंजी नांवाची एक मुलगी होती, ती भांड्यांत पाणी भरून जवळच खेळत होती. भांड्यांत पाणी भरायचें नि फेकायचें असा तिचा खेळ चालला होता. खेळतां खेळतां तिच्या भांड्यांत एक सोनेरी मासा अडकला. तो सुंदर मासा पाहून पंजी फार खूष झाली. तिनें तो मासा आपल्या आईला दिला.

आई म्हणाली, ' तूं विस्तव पेटव. आपण हा मासा भाजून खाऊं '

त्याबरोबर त्या माशानें किंकाळी फोडली अन् तो पंजीच्या आईला म्हणाला, 'मला मारूं नकोस. मी तुला एक मोतीं देतों, तें तूं ज्या भांड्यांत ठेवशील, तें भांडें धान्यानें भरेल !'

असें म्हणून त्या माशानें आपल्या तोंडांतून एक पाणीदार मोतीं काढून तें तिच्या हातीं दिलें. तिनें तें आपल्या पोलक्याच्या खिशांत ठेवल्यावर तो मासा नदींत सोडून दिला !

घरीं आल्यावर तिनें तें मोतीं घरांतल्या घड्यांत ठेवलें, त्याबरोबर तो घडा तांदळांनीं भरला ! पंजीची आई अशा रीतीनें रोज शेंकडों घडे तांदूळ निर्माण करूं लागली ! ते तांदूळ विकून तिनें एक सुंदर घर बांधलें. तशा प्रकारचें सुंदर घर त्या गांवांत कुणाचेंहि नव्हतें !

पंजीची आई सोन्याचांदीचे दागिने अंगावर घालून गांवांतून हिंडूंफिरूं लागली, कीं गांवांतल्या बाकीच्या बायका मनांतल्या मनांत जळफळायच्या !

त्या गांवांत अतिचलाख अशी एक स्त्री होती. तिचें नांव धूमल असें होतें. पंजीच्या आईकडे असलेलें सारें धन आपण हस्तगत करायचें असें तिनें मनांत ठरविलें अन् त्यासाठीं एक उपाय शोधून काढला !

पंजीची आई रोजच्याप्रमाणें पाणी आणण्यासाठीं विहिरीवर गेली होती. तिनें राजू लावलेली कळशी विहिरींत सोडली. कळशी पाण्यानें भरल्यावर राजू ओढण्यासाठीं ती विहिरीच्या काठावरून खालीं वांकली. तें पहातांच धूमलनें धक्का देऊन तिला विहिरींत ढकललें. पंजीची आई पाण्यांत बुडून मेली !

त्यानंतर धूमलनें पंजीच्या बापाशीं लग्न लावलें. घरांत पंजीच्या आईची जी चीजवस्तु होती, ती आतां धूमलच्या माल-

कीची झाली. धूमल ऐषआरामांत राहूं लागली; पण बिचाऱ्या पंजीचे मात्र घरांत हाल होऊं लागले ! धूमल पंजीला सुकेंरुखें खायला देई अन् तिच्याकडून भरपूर काम करून घेई. रडून रडून पंजीचे डोळे सुजत असत; पण तिचा बापहि तिच्याकडे लक्ष देत नसे !

एक दिवशीं पंजी बकऱ्या चारण्यासाठीं जंगलांत गेली असतां पाऊस पडूं लागला, तेव्हां आपल्या अंगावरचे कपडे भिजूं नयेत म्हणून तिनें ते अंगावरून उतरले अन् एका झाडाच्या ढोलींत ठेवले. पाऊस थांबल्यावर तिनें ते कपडे त्या ढोलींतून बाहेर काढले, तेव्हां त्या कपड्यांसोबत एक चांदीची डबी बाहेर आली. पंजीनें ती डबी उघडली मात्र, लगेच तिथें मोठा बाजार निर्माण झाला ! त्या बाजारांत सगळ्या प्रकारचीं दुकानें होतीं ! तिनें तीं दुकानें पहातांच ती आश्चर्यचकित झाली. त्यानंतर तिनें ती डबी झांकतांच बाजार बंद होऊन जंगल दिसूं लागलें.



त्याचवेळीं त्या जंगलांत एक राजपुत्र शिकारीसाठीं आला होता अन् त्यानेंहि तो बाजार पाहिला होता. पंजीनें डबी बंद करीपर्यंत तो राजपुत्र झाडाआड लपून सारा देखावा पहात होता.

पंजी जेव्हां आपल्या घरीं जाऊं लागली, तेव्हां तो लपत-छपत तिच्या मागून जाऊं लागला. त्यानें तिचें घर पाहिल्यावर तो परत आपल्या राजवाड्याकडे निघून गेला.

राजवाड्यांत आल्यावर त्या राजपुत्रानें आपलें खाणेंपिणें सोडून दिलें, तेव्हां राजानें त्याला विचारलें, 'बाळा, तूं खाणेंपिणें बंद कां केलेंस ? तुला कशाची काळजी लागली आहे ?'

त्यावर राजपुत्र म्हणाला, 'मी एका शेतकऱ्याच्या मुलीशीं लग्न लावणार आहें.'

राजा म्हणाला, 'तुझी तशी इच्छा असेल, तर माझी मुळींच हरकत नाहीं, पण तूं खाणेंपिणें बंद करूं नकोस !'

कांहीं दिवसांनंतर त्या राजपुत्राचें शेतकऱ्याच्या मुलीशीं लग्न झालें; पण तें लग्न ज्या मुलीशीं झालें, ती पंजी नव्हती ! धूमलनें कारवाई करून आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावलें होतें !

लग्न झाल्याच्या रात्रीं तो राजपुत्र आपल्या बायकोला म्हणाला, 'जरा तेवढी डबी उघडून दाखव ना मला !'

त्यावर बायको म्हणाली, 'माझ्याकडे कसलीच डबी नाहीं.'

त्याबरोबर राजपुत्रानें आपल्या बायकोचा बुरखा काढला; पण ती पंजी नव्हती. आपल्याशीं शेतकऱ्यानें कपटकारस्थान केलें आहे असें राजपुत्राला वाटल्यामुळें त्यानें तलवारीनें आपल्या बायकोचें मुंडकें मारलें अन् तें एका घड्यांत भरून शेतकऱ्याकडे पाठवून दिलें !

आपल्या मुलीचें मुंडकें पहातांच धूमल रडरड रडली अन् तिनें आपला राग बिचाऱ्या निरपराध पंजीवर काढला! ती धांवत गेली अन् एक जादूचा खिळा घेऊन आली. त्यानंतर तो खिळा तिनें पंजीच्या डोकींत ठोकला! खिळा ठोकतांक्षणींच पंजीचें पांखरूं झालें अन् तें आकाशांत उडून गेलें!

उडतांउडतां तें पांखरूं राजाच्या बागेंत जाऊन पोहोंचलें.

तें पांखरूं हंसूं लागल्यावर फुलांचा अन् रडूं लागल्यावर मोत्यांचा वर्षाव होत असे! बागेच्या माळ्यानें त्या करामती पांखराची हकीकत राजपुत्राला जाऊन सांगितली.

राजपुत्रानें जाळें लावून त्या पांखराला पकडलें. नंतर तें अनोळखी पांखरूं त्यानें राजवाड्यांत आणलें. त्यानंतर त्यानें स्वतः त्या पांखराला न्हाणवलें! त्याला न्हाणवीत असतां त्याचा हात त्या पांखराच्या डोक्याला लागतांच डोक्यांतला खिळा त्याच्या बोटाला बोंचला, त्याबरोबर त्यानें तो खिळा त्या पांखराच्या डोक्यांतून उपटून काढला! खिळा उपटतांच तें पांखरूं अदृश्य झालें अन् त्याच्या जागीं पंजी हंसत हंसत उभी असल्याचें त्याला दिसलें!

धूमलनें आपल्याला पांखरूं कसें बनविलें तें पंजीनें राजपुत्राला सांगितलें. त्यानंतर त्या राजपुत्रानें पंजीशीं लग्न लावलें अन् तीं दोघेंहि सुखानें नांदूं लागलीं. राजपुत्राला इच्छा झाल्यावर तो पंजीला ती जादूची डबी उघडायला लावी अन् त्यानंतर तीं दोघेंहि बाजारांत हिंडतफिरत असत.

तितक्यांत सूर्योदय झाल्यामुळें बादशहा चांदजादीला ठार न मारतांच बाहेर निघून गेला. तिला ठार मारण्याचें त्याला

सुचलेंच नाहीं; कारण, पंजीकडे ज्या प्रकारची जादूची डबी होती, तशा प्रकारची डबी जर आपल्याकडे असती, तर बरें झालें असतें, असा विचार त्यावेळीं बादशहाच्या मनांत घोळत होता !

◆ ◆

# नऊ

दुसऱ्या दिवशीं पहांटेला सोनाजादीनें चांदजादीला जागें केलें अन् एक चांगलीशी कहाणी सांगण्यास सांगितलें.

चांदजादीनें कहाणी सांगायला सुरुवात केली–

शेंकडों वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. चीन देशांतल्या एका शहरांत एक म्हातारी रहात होती. ती विधवा होती; तथापि तिला अलादीन नांवाचा एक मुलगा होता. ती म्हातारी कपडे शिवून आपल्या मुलाचें पालनपोषण करीत असे.

एक दिवशीं अलादीन मोकळ्या मैदानांत खेळत असतां तिथें एक वाटसरू आला अन् त्यानें अलादीनला विचारलें, 'तूं मुस्तफाचा मुलगा का रे?'

अलादीन म्हणाला, 'माझ्या बाबांचें नांव मुस्तफा असलें, तरी ते बऱ्याच वर्षांपूर्वी वारले!'

त्यावर तो वाटसरू म्हणाला, 'ठीक, ठीक, तर मी तुझा चुलता आहें. मी बरींच वर्षें परदेशांत होतों, आतां माझ्या भावाची

हालहवाल काय आहे तें पहाण्यासाठीं मुद्दाम इथें आलों; पण माझा भाऊ आतां या जगांत नाहीं हें ऐकून मला फारच वाईट वाटतें!'

त्यानंतर त्या वाटसरूनें अलादीनच्या हाताला धरलें अन् तो त्याला म्हणाला, 'मला तुझ्या आईकडे घेऊन चल.'

अलादीन त्या वाटसरूला आपल्या घरीं घेऊन आला. तिथें आल्यावर त्या वाटसरूनें अलादीन अन् त्याची आई यांना आपल्या परदेशांतल्या प्रवासांतील बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्यानंतर तीं तिघेंहि एकत्र जेवलीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो वाटसरू अलादीनला बरोबर घेऊन बाजारांत गेला अन् अलादीनसाठीं त्यानें बरेचसे कपडे खरेदी केले.

त्यानंतर ते दोघेहि एका बागेंत गेले. बागेंत हिंडल्यावर ते एका डोंगरापाशीं गेले.

तिथें गेल्यावर तो वाटसरू अलादीनला म्हणाला, 'आतां मी तुला एक चमत्कार दाखवितों. जवळपास कुठें तरी काटक्या सांपडल्या तर जमा करून आण. तोंवर मी इथेंच बसतों अन् तूं काटक्या आणल्यावर इथें विस्तव पेटवतों.'

थोडयाच वेळांत अलादीन वाळलेल्या काटक्या घेऊन तिथें आला. त्या वाटसरूनें विस्तव पेटविला अन् तो मंत्र म्हणूं लागला,

आजा झन झन ।
चल चल छन छन ॥
दिखादे अपनी चाल ।
कर दे मुझे निहाल ॥

धम धम धन धन।
धूमे धुमे धन धन ॥

त्यानें तो मंत्र म्हणतांक्षणींच धुराचे लोट उठले अन् धडाम् असा मोठा आवाज झाला! त्या आवाजासरशीं तो डोंगर थरथरला अन् एक मोठा दगड खालीं कोसळला! तो दगड कोसळल्यानंतर त्याच्याखालीं एक चकचकीत दगड असल्याचें अलादीनला दिसलें. त्या वाटसरूनें तो दगड वर उचलला तेव्हां खालीं एक दरवाजा असून त्याच्याखालीं कांहीं पायऱ्या असल्याचें अलादीननें पाहिलें.

त्यानंतर तो वाटसरू अलादीनला म्हणाला, 'खालीं उतर. जरासा चालून गेलास म्हणजे तुला एक लहानसा दरवाजा दिसेल. त्या दरवाजासमोर एक बाग असून तिच्या मध्यभागीं एक दिवा पेटत आहे. तो दिवा तूं माझ्याकडे घेऊन ये. तुला वाटलें तर त्या बागेंतलीं कांहीं फळें तोडून घे तुझ्यापाशीं.'

त्यानंतर त्या वाटसरूनें आपल्या जवळची एक अंगठी अलादीनच्या बोटांत घातली अन् तो त्याला म्हणाला, 'ही अंगठी तुझ्या बोटांत असल्यावर तूं कोणत्याहि संकटांतून वांचशील!'

अलादीन पायऱ्या उतरून खालीं गेला. तिथें गेल्यावर त्यानें तो दिवा उचलून घेतला. अन् त्यानें त्या बागेंतलीं कांहीं फळेंहि तोडून घेतलीं. वास्तविक त्यानें जीं फळें तोडलीं होतीं, तीं खरीं फळें नसून तीं हिऱ्यामाणकांचीं फळें होतीं!

तिकडे तो वाटसरू अस्वस्थ मनानें अलादीनची वाट पहात होता, इतक्यांत आंतून आवाज आला, 'काका, मला लौकर बाहेर काढा.'

त्यावर तो वाटसरू म्हणाला, ' अगोदर तो दिवा माझ्याकडे दे, म्हणजे कांहीं अडचण न येतां तुला बाहेर येतां येईल. '

' नाहीं काका, अगोदर मला बाहेर काढा, म्हणजे हा दिवा मी तुमच्या हातीं देईन. '

त्याबरोबर तो वाटसरू चिडला अन् मंत्र म्हणूं लागला--

आजा रे धम घूसर आजा ।
कर दे बंद बडा दरवाजा ।
खटपट खटपट झटपट झटपट ।
खिसक खिसक दरवाजे चटपट ॥

त्याबरोबर तो चकचकीत दगड त्या गुहेच्या तोंडावर घट्ट बसला अन् बिचारा अलादीन आंत अडकला !

खरें सांगायचें म्हणजे तो वाटसरू अलादीनचा चुलता नव्हताच मुळीं तो एक आफ्रिकन जादूगार होता. तो जादूचा दिवा करामती असून तो ज्याच्यापाशीं असेल, तो दुनियेंतला एक मोठा माणूस होतो हें त्या जादूगाराला ठाऊक होतें. तो दिवा त्या जादूगारानें स्वत:साठीं आणायला सांगितलें नव्हतें. तो दिवा अलादीनलाच देणार होता तो; पण अलादीननें त्याचें सांगणें न ऐकल्यामुळें तो त्याच्यावर रागावला अन् परत आफ्रिकेंत निघून गेला !

अलादीन त्या गुहेंत तीन दिवस अडकून पडला होता. आपली सुटका होण्यासाठीं तो हात जोडून देवाची प्रार्थना करीत होता !

हात जोडतां जोडतां नकळत त्याच्या हातांतल्या अंगठीचा त्या दिव्याला स्पर्श झाला, त्याबरोबर त्या दिव्यांतून एक भयंकर देव प्रकट झाला !

देव अलादीनला म्हणाला, ‘ तुझी काय आज्ञा असेल ती सांग मला. मी तुझा सेवक आहें ! ’

अलादीन म्हणाला, ‘ अरे बाबा, अगोदर मला या कैद-खान्यांतून बाहेर काढ. ’

थोड्याच वेळांत त्या ‘ देवा ’ नें अलादीनला त्याच्या घरीं पोंचविलें अन् आपण अदृश्य झाला.

घरीं पोहोंचतांच अलादीन आपल्या आईकडे खाण्यासाठीं कांहींतरी मागूं लागला; पण घरांत त्याला खायला देण्यासारखें कांहींच नव्हतें ! त्याची आई दोन दिवस उपाशी होती !

अलादीन म्हणाला, ‘ हरकत नाहीं. माझ्याकडे असलेली ही दिवली कुणाला तरी विकतों, म्हणजे थोडेसे पैसे मिळतील. ’

त्या दिवलीवर कितीतरी दिवसांची धूळ सांचली होती. ती साफ करण्यासाठीं अलादीनच्या आईनें घांसली मात्र, लगेच तिथें देव प्रकट झाला. त्याला पाहून अलादीनची आई घाबरली, म्हणून अलादीननें ती दिवली आपल्या हातीं घेतली.

तेव्हां तो देव अलादीनला म्हणाला, ‘ तुझें कसलें काम करायचें असेल तर मला सांग. मी चाकर आहें तुझा ! ’

अलादीन त्याला म्हणाला, ‘ आम्ही दोघेंहि उपाशीं आहोंत, तेव्हां आम्हांला पुरेल एवढें अन्न कुठूनतरी झटपट घेऊन ये म्हणजे झालें. ’

देव अदृश्य झाला अन् थोड्याच वेळांत पंचपक्वान्नांनीं भरलेल्या भल्यामोठ्या दोन थाळ्या घेऊन आला.

अलादीन अन् त्याची आई जेवायला बसल्यावर तो देव परत अदृश्य झाला.



अशाप्रकारें अलादीन त्या दिवलीपासून बरेच दिवस आपल्याला हवीं तीं कामें करून घेत असे. दिवली घांसल्यावर देव प्रकट होई अन् अलादीन त्याच्याकडून आपल्या मनासारखें काम करून घेई !

एक दिवशीं अलादीन बाजारांत गेला असतां त्यानें राजाची दवंडी ऐकली कीं, राजकन्या स्नानासाठीं बाहेर जाणार आहे, त्यासाठीं साऱ्या लोकांनी आपापलीं घरें बंद करून आंत रहावें. जो कुणी घराबाहेर दिसेल, त्याची गर्दन छाटली जाईल !

ती दवंडी ऐकतांच राजकन्या सुस्वरूप असली पाहिजे असें अलादीनला वाटलें, म्हणून तिला पहाण्यासाठीं तो एका मोठ्या झाडाच्या आड लपून बसला अन् ती जेव्हां त्या वाटेनें जाऊं लागली, तेव्हां तिला पाहून तो तिच्यावर आषक्त झाला. त्याला वाटलें होतें त्याप्रमाणें ती खरोखरच फार रूपवान होती. आपण त्या राजकन्येशींच लग्न करायचें असें त्यानें मनांत ठरविलें.

अलादीन आपल्या आईपाशीं तसें बोलतांच ती हंसली अन् म्हणाली, 'तुझें डोकें फिरलें असावें असें मला वाटतें. अरे वेड्या, कुठें राजा भोज अन् कुठें गंग्या तेली ! आमच्यासारख्या गरिबांशीं राजाचा सोयरीकसंबंध होणें शक्य तरी आहे का ?'

'नाहीं आई, मी त्या बावतींत पूर्ण विचार केला आहे.' अलादीन आपल्या आईला म्हणाला, 'तूं फक्त राजवाड्यांत जा अन् माझ्या मनांतला हेतु बादशहाला सांग. इतकेंच नव्हे, तर गुहेंतल्या बागेंतून आणलेलीं हीं अमोलिक फळें मीं बादशहाला भेटीदाखल दिलीं आहेत असेंहि सांग त्याला.'

आपल्या एकुलत्या एका मुलाचा हट्ट पुरविण्यासाठीं अलादीनची आई तीं फळें घेऊन बादशहापाशीं गेली. तीं फळें पहातांच बादशहाला नवल वाटलें. तशा प्रकारचीं फळें त्यापूर्वीं त्यानें कधींच पाहिलीं नव्हतीं. बादशहानें त्यांची परीक्षा करविली तेव्हां ते अमोलिक हिरे असल्याचें त्याला कळलें.

बादशहा अलादीनच्या आईला म्हणाला, 'अशा प्रकारच्या फळांनीं भरलेलीं चाळीस तबकें चाळीस काळ्या नोकरांसह जर तुझा मुलगा माझ्याकडे आणील, तर मी माझ्या मुलीचें त्याच्याशीं लग्न लावून देईन !'

अलादीनच्या बाबतींत ती गोष्ट फारशी अवघड नव्हती. त्यानें त्या जादूच्या दिव्याच्या मदतीनें फळांनीं भरलेलीं चाळीस तबकें अन् चाळीस काळे नोकर बादशहाला भेटीदाखल दिल्याबरोबर बादशहानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें.

लग्न लागल्यानंतर अलादीननें तो जादूचा दिवा घांसून देवाला बोलावलें अन् एका रात्रींत सुंदर राजमहाल बनविण्याची त्याला आज्ञा केली. देवानेंहि एका रात्रींत आलिशान राजमहाल

उभा करून दिला. त्या महालांत हिरेमाणकें झळकत होतीं.

त्यानंतर अलादीन अन् त्याची बायको अशीं दोघेंहि त्या राजमहालांत कांहीं वर्षें सुखानें राहिलीं; पण तिकडे त्या जादूगाराला चैन पडेनासें झालें. तो जादूचा दिवा हस्तगत करण्यासाठीं काय उपाय करावा यासंबंधीं तो जादूगार विचार करीत होता. अखेर त्याचा शोध करीत हिंडावें असें त्यानें ठरविलें. हिंडतां हिंडतां कांहीं दिवसांनीं तो आफ्रिकन जादूगार अलादीनच्या राजमहालापाशीं आला. त्यानें एका दुकानांतून तशा प्रकारच्या एक डझन दिवल्या खरेदी केल्या अन् त्या एका टोपलींत भरून तो जादूगार रस्त्यानें ओरडत चालला–

चिरागवाला आया।<br>
नये चिराग लाया॥<br>
पुराने चिराग लाओ।<br>
नये चिराग ले जाओ॥

अलादीन त्यावेळीं शिकारीसाठीं जंगलांत गेला होता; पण त्याची बायको महालांत होती, तिनें तो आवाज ऐकला अन् आपल्या महालांत जो जुना दिवा आहे तो देऊन त्याच्याऐवजीं नवा दिवा घ्यावा असा तिनें विचार करून आपल्या दासीला तो दिवा घेऊन येण्यास सांगितलें.

दासीनें महालांतला दिवा नेऊन जादूगाराजवळ दिला. त्यानें तो ओळखला अन् घांसला, त्याबरोबर देव प्रकट झाला!

जादूगारानें त्या देवाला सांगितलें, 'हा अलादीनचा महाल इथून उचल अन् आफ्रिकेंत घेऊन चल!'

शिकारीला गेलेला अलादीन परत आला, तेव्हां त्याचा महाल त्याला तिथें न दिसल्यामुळें त्याला दुःख झालें अन् तो

तिथल्या तिथें बेशुद्ध होऊन पडला. कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला, तेव्हां रडत रडत मनांत म्हणाला, 'हाय ! माझी बिबी अन् माझा महाल हीं कुणी नेलीं इथून ?'

आपली मुलगी बेपत्ता झाल्याचें जेव्हां बादशहाला कळलें, तेव्हां त्याला चीड आली अन् त्यानें अलादीनला सांगितलें, 'जर माझी मुलगी चाळीस दिवसांच्या आंत मला जिवंत दिसली नाहीं तर मी तुझी गर्दन छाटल्याशिवाय रहाणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव !'

सुदैवानें जादूची अंगठी अलादीनपाशीं होती. त्यानें ती अंगठी घासतांच देव प्रकट झाला. अलादीननें त्याला आज्ञा केली, 'जिथें माझी बिबी आहे, तिथें मला नेऊन पोहोंचव.'

देवानें थोड्याच वेळांत त्याला त्याच्या बायकोच्या महालांत पोहोंचविलें. तिथें पोहोंचल्यावर त्यानें आपल्या बायकोला हांक मारली. नवऱ्याचा आवाज ऐकतांच आंत असलेली त्याची बिबी बाहेर आली. एकमेकांना पहातांच दोघेंहि खूष झालीं !

त्या जादूगारापाशीं असलेला तो जादूचा दिवा हस्तगत करण्यासाठीं अलादीन नि त्याची बायको यांनीं एक युक्ति केली !

अलादीनच्या बायकोनें तो जादूगार झोंपला असतांना त्याच्या तोंडावर एक विषारी द्रव शिंपडलें, त्याबरोबर तो जादूगार लगेच बेशुद्ध पडला ! ती संधि साधून अलादीननें त्याच्या खिशांतला दिवा काढून घांसल्यावर प्रकट झालेल्या देवाला सांगितलें, 'हा राजमहाल इथून उचल नि चीनमध्यें नेऊन ठेव !'

थोड्याच वेळांत अलादीन अन् त्याची बायको हीं दोघेंहि राजमहालासह चीनमध्यें येऊन पोहोंचलीं ! आपल्या मुलीला

जिवंत पाहिल्यावर बादशहाला अतिशय आनंद झाला ! त्यानिमित्त त्यानें सर्वांना मोठी मेजवानीहि दिली !

कांहीं वर्षांनंतर तो बादशहा मेला, तेव्हां त्याच्या पश्चात् तें पद अलादीनला देण्यांत आलें. अलादीन नि त्याची बायको या दोघांनीं त्यानंतर बरींच वर्षें राज्य केलें !

बादशहा शहर्यारला ती कहाणी अतिशय आवडली.

जेव्हां चांदजादी ती कहाणी पुरी करूं लागली, तेव्हां तिच्या नवऱ्यानें तिला विचारलें, 'अशा प्रकारच्या आणखीन कांहीं कहाण्या तुला सांगतां येतील का ?'

चांदजादी होकारार्थी मान हलवून म्हणाली, 'अशा असंख्य कहाण्या मला माहीत आहेत; पण मी त्या सांगत असतांना तुम्ही कंटाळतां कामा नये !'

'छे, छे, तसें मुळींच होणार नाहीं. मी तुझ्या कहाण्या सतत ऐकेन.' शहर्यारनें सांगितलें.

पण तितक्यांत सूर्योदय झाल्यामुळें तो तिथून उठून गेला.

# दहा

दुसऱ्या दिवशीं पहांट होतांच चांदजादीनें कहाणी सांगायला सुरुवात केली–

इराणच्या बादशहानें एकदां दरबार भरविला होता अन् त्या दरबारांत त्याचें कामकाज चालू होतें, इतक्यांत एक हिंदुस्तानी माणूस तिथें आला. त्याच्यापाशीं निरनिराळीं रत्नें जडविलेला एक लांकडी घोडा होता

त्या माणसानें बादशहापुढें आपलें मस्तक नमविलें अन् तो त्याला म्हणाला, ‘हुजूर, आपण आतांपर्यंत आश्चर्यकारक अशा अनेक वस्तु पाहिल्या असाल; पण जी वस्तु आपण कधींच पाहिली नाहीं अशी वस्तु मी आणली आहे. हा माझा घोडा आहे. तो जितका देखणा आहे, तितकाच चलाख आहे. हा थोड्याच वेळांत आपल्याला आकाशांतून फिरवून आणील. जर आपण हुकूम देत असाल, तर मी याचें उड्डाण आतांच आपल्याला दाखवितों.’

बादशहा तसल्या वस्तूंचा शौकीन असल्यामुळें त्यानें होका-

रार्थी मान हलविली अन् तो त्या घोडेवाल्याला म्हणाला, 'तसें असेल, तर तूं त्या घोड्यावर बसून सर्वांत उंच असलेल्या डोंगरावर जा नि तिथें जें एक झाड आहे, त्याची एक लहानशी फांदी माझ्यासाठीं घेऊन ये.'

बादशहाचें बोलणें ऐकतांच तो घोडेवाला आपल्या घोड्यावर चढला अन् त्यानें घोड्याच्या मानेवर असलेली चावी फिरविली, त्याबरोबर तो लांकडी घोडा दौडत आकाशांत निघून गेला. थोड्याच वेळांत तो नज़रेच्या टप्प्यापलीकडे गेला.

कांहीं वेळानें तो घोडा परत आला. घोडेवाला घोड्यावरून खालीं उतरला. त्यानें बरोबर आणलेली झाडाची लहानशी फांदी बादशहाच्या पायांपाशी ठेवली. बादशहाला अतिशय आनंद झाला. त्यानें तो घोडा खरेदी करण्याचें ठरविलें.

घोडेवाला म्हणाला, 'हुजूर, आपण माझा आदर कराल अन् भरपूर मोबदला देऊन हा घोडा आपण विकत घ्याल हें मला माहीत आहे; पण ज्या माझ्या एकुलत्या एका मुलीनें हा घोडा बनविला आहे, तिला त्यापासून काय फायदा ?'

त्यावर बादशहा म्हणाला, 'तुझ्या बोलण्याचा हेतु कळला नाही मला. तुझें जें कांही म्हणणें असेल तें उघड शब्दांत मला सांग.'

घोडेवाला म्हणाला, 'हुजूर, कसूर माफ करा; पण मी घोड्याच्या बदली आपल्याकडे एक चीज मागतों तेवढी द्या. मला आपल्या शहाजादीशीं लग्न लावायचें आहे.'

घोडेवाल्याचें तें बोलणें ऐकतांच दरबारांतले सारे सरदार हंसले. शहजादा फिरोज रागानें लाल झाला; पण बादशहानें त्याची समजूत केली.

तो घोडेवाला फिरोजला म्हणाला, 'आपल्याला या घोड्याची परीक्षा पहायची असेल तर पहायला माझी मुळींच हरकत नाहीं !'

त्या घोडेवाल्याचें बोलणें ऐकतांच फिरोज चटकन त्या घोड्यावर स्वार झाला. त्या घोडेवाल्यानें घोड्याच्या मानेवरची चावी फिरविली होती, त्याप्रमाणें फिरोजनें ती चावी फिरवितांच तो घोडा आकाशांतून उडत चालला !

तेव्हां तो घोडेवाला बादशहाला म्हणाला, 'हुजूर, त्या घोड्याच्या बाबतींत आणखी कांहीतरी सांगणार होतों; पण शहाजाद्यानें मला बोलण्याची संधीच दिली नाहीं ! दुसऱ्या चावीनें तो घोडा खाली उतरतो. ती चावी त्या घोड्याच्या डाव्या कानाखालीं आहे. शहाजाद्यानें फारच घाई केली. आतां जर अपघात झाला तर मला दोष देऊं नका !'

आपला मुलगा संकटांत सांपडल्याचें समजतांच बादशहाचा क्रोध अनावर झाला अन् रागाच्या भरांत त्यानें त्या हिंदुस्तानी माणसाला फिरोज परत येईपर्यंतच्या मुदतीची कैदेची शिक्षा दिली.

तिकडे फिरोज आकाशांतून उडत चालला होता. दिवस संपून रात्रीला सुरवात झाली होती. तितक्यांत अचानक त्याचा हात दुसऱ्या चावीवर पडला. म्हणतांक्षणीच त्यानें ती चावी फिरविली. घोडा एका किल्ल्यांत उतरला. तिथें शेंकडों काळे नोकर झोंपले होते अन् त्यांच्यापाशीं नंग्या तलवारीहि होत्या. कदाचित तो कोणत्यातरी बादशहाचा महाल असावा. फिरोज एकेक दालन ओलांडतां ओलांडतां महालाच्या मध्यभागीं जाऊन पोहोंचला.



तिथें एक कलाकुसर केलेला भला मोठा पलंग होता अन् त्याच्यावर एक सुंदर मुलगी झोंपली होती. फिरोजनें तितकी सुंदर मुलगी कधींच पाहिली नव्हती.

त्यानें तिला जागें केलें नि घडलेली सारी हकीकत तिला सांगितली त्यावर ती मुलगी त्याला म्हणाली, 'मी बंगाल देशाची राजकन्या आहें. माझ्या देशांत तुम्हांला कोणत्याच प्रकारचें दुःख होणार नाहीं.'

तिनें आपल्या नोकरांमार्फत त्याच्या जेवणाची नि झोंपण्याची व्यवस्था केली.

दुसऱ्या दिवशीं फिरोज राजकन्येला म्हणाला 'तुझा स्वभाव मला फारच आवडला. जर तुझी इच्छा असेल, तर मी तुझ्याशीं लग्न लावीन.'

राजकन्या म्हणाली, 'लग्नाच्या बाबतींत मला कांहींच सांगतां येणार नाहीं. माझ्या वडिलांकडे तुम्ही ही गोष्ट काढा.'

त्यावर फिरोज म्हणाला, 'पण तुझे वडील बडे बादशहा आहेत. त्यांच्यासमोर मी रिकाम्या हातानें कसा जाऊं? यावेळीं माझ्यापाशीं कोणतीहि मौल्यवान वस्तु नाहीं; पण तूं म्हणत असशील तर मी माझ्या देशांत परत जातों. मला पाहिल्यावर माझ्या माता-पितरांना आनंद होईल. त्यानंतर कांहींतरी भेट घेऊन येतों अन् तुझ्या वडिलांना विवाहाबद्दल विचारतों.'

त्यावर राजकन्या म्हणाली, 'तुमचा विचार योग्य आहे; पण त्यापूर्वी आमच्या बंगाल देशांत तरी सफर करा.'

फिरोजनें तिचें म्हणणें मान्य केलें अन् दोन महिनेपर्यंत बंगाल देशाची सफर केली.

दोन महिन्यांनंतर फिरोज जेव्हां आपल्या मायदेशीं जाण्यास निघाला, तेव्हां तो राजकन्येला म्हणाला, 'मला तुझ्याशिवाय एक दिवसहि जगतां यायचें नाहीं. त्यासाठीं तूं माझ्यावर दया कर अन् माझ्या सोबत ये. तुला पाहिल्यावर माझ्या आईबापांना आनंद होईल.'

त्यावर राजकुमारी म्हणाली, 'तुमचा इराण देश मला पहातां आल्यास मलाहि आनंद होईल.'

रात्रीं निजानीज झाल्यावर फिरोज अन् राजकन्या अशीं दोघेंहि त्या उडत्या घोड्यावर बसलीं अन् इराणांत निघून गेलीं.

घोडा वेगानें निघाला अन् दोन तासांतच इराणला जाऊन पोहोंचला. तीं दोघेंहि शहरापासून दूर असलेल्या एका महालांत उतरलीं. राजकन्या तिथेंच राहिली अन् आपण आल्याची खबर देण्यासाठीं फिरोज बादशहापाशीं गेला

मुलगा सुखरूप परत आल्याचें पहातांच बादशहाला आनंद झाला. त्यानें फिरोजच्या गळ्याला मिठी मारली अन् तो त्याला

म्हणाला, 'ती राजकन्या कुठें आहे? मी तिला शुभाशीर्वाद देणार आहें अन् तिच्याशीं लग्न लावण्याची तुलाहि परवानगी देत आहें.'

आनंदाप्रीत्यर्थं बादशहानें साऱ्या देशाला सुट्टी जाहीर केली, त्या घोडेवाल्याची कैदखान्यांतून मुक्तता केली अन् त्या राजकन्येला पहाण्यासाठीं तो महालाकडे निघून गेला.

त्या हिंदुस्तानी घोडेवाल्याची कैदखान्यांतून सुटका होतांच त्यानें बादशहावर सूड उगवण्याचें ठरविलें. बादशहा अन् फिरोज हे महालांत जाऊन पोहोंचण्यापूर्वींच तो महालांत गेला अन् तिथें असलेल्या राजकन्येला म्हणाला, 'मी बादशहाचा दूत असून तुम्हांला नेण्यासाठीं आलों आहें. तिकडे किल्ल्यांत बादशहा नि फिरोज हे तुमची वाट पहाताहेत.'

त्यानंतर त्यानें त्या राजकन्येला घोड्यावर बसविलें अन् तिच्यासह तो आकाशांत उडून गेला!

ज्यावेळीं बादशहा अन् फिरोज हे महालांत जाऊन पोहोंचले, त्यावेळीं तिथें ती राजकन्या नव्हती अन् तो घोडाहि नव्हता! तें पहातांच बादशहाच्या मनाला धक्का बसला. वाटेल तो प्रयत्न करून आपण त्या राजकुमारीचा पत्ता लावणार अशी त्यानें प्रतिज्ञा केली अन् व्यापाऱ्याचा वेष घेऊन तो शहराच्या बाहेर निघून गेला.

तिकडे तो उडता घोडा त्या दोघांसह काश्मीरांत जाऊन उतरला, तेव्हां राजकन्या मदतीसाठीं मोठ्यानें ओरडूं लागली. ती ज्या जंगलांत उतरली होती, त्या जंगलांत काश्मीरचा सुलतान शिकार शोधीत होता. तिची ओरड ऐकल्यावर तो आवाजाच्या दिशेनें निघाला, तेव्हां ती राजकन्या एका झाडाखालीं बसली

असल्याचें त्यानें पाहिलें. त्यानें त्या घोडेवाल्याला कैदेंत टाकलें अन् राजकन्येसह तो आपल्या महालांत आला.

त्या सुलतानानें तिच्याशीं लग्न लावण्याची आपली इच्छा तिला बोलून दाखविली, पण राजकन्येनें त्या गोष्टीला नकार दिला. ती वेळींअवेळीं फिरोजची आठवण काढीत असे. म्हणतां म्हणतां ती कृश होत चालली, तेव्हां सुलतानानें तिच्याशीं लग्न लावण्याचा विचार सोडून दिला.

अखेर राजकन्येचा आजार अतिशय वाढला. बरेचसे वैद्य बोलावून आणले, पण कांहीं केल्या आजार हटेनासा झाला !

म्हणतां म्हणतां राजकन्येला वेड लागलें ! तीं आपल्या अंगावरचीं वस्त्रें फाडूं लागली अन् केंस विस्कटून टाकूं लागली. ती आजारांतून बरी होणें अशक्य आहे असें वैद्यांनीं सुलतानाला सांगितलें.

काश्मीरच्या सुलतानानें जंगलांतून एक राजकन्या आणली असून तो तिच्याशीं लग्न लावूं पहात होता; पण ती राजकन्या आतां वेडी झाली आहे अशी बातमी देशोदेशीं पसरली.

फिरोजलाहि ती बातमी समजतांच सारी गोष्ट त्याच्या लक्षांत आली. त्यानें वैद्याचा वेष घेतला अन् तो काश्मीरांत गेला !

तिथें गेल्यावर त्यानें सुलतानाला सांगितलें, 'मी आजारी असलेल्या मुलीला बरी करीन; पण त्यापूर्वीं मला तिची एकांतांत भेट घ्यावी लागेल.'

सुलतानानें त्याला लगेच राजकन्येपाशीं पाठवून दिलें. तिथें गेल्यावर तो हलक्या आवाजांत तिला म्हणाला, 'राजकन्ये,

माझ्याकडे पहा. मी फिरोज तुला संकटांतून सोडविण्यासाठीं इथें आलों आहें.'

सुटका होण्यासाठीं काय युक्ति करावी त्याबद्दल दोघांनींहि आपापसांत विचारविनिमय केला.

राजकन्या लौकरच बरी होईल असें सुलतानाला समजतांच त्याला आनंद झाला.

फिरोज सुलतानाला म्हणाला, 'जर एखादा आकाशांत उडणारा घोडा पैदा करून द्याल, तर मी थोड्याच दिवसांत राजकन्येला आजारांतून साफ बरी करीन.'

सुलतान म्हणाला, 'वैद्यबुवा, आपण सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करतों.'

दुसऱ्या दिवशीं उडता घोडा मैदानांत उभा केला गेला. फिरोजनें राजकन्येला त्याच्यावर वसविलें अन् तोंडानें कांहींतरी पुटपुटत तो आकाशांतून चकरा मारूं लागला.

राजकन्येच्या प्रकृतीला आस्तेआस्ते आराम पडत चालल्याचें पाहून सुलतानाला आनंद झाला; पण तितक्यांत फिरोज अन् ती राजकन्या आकाशांत उडून गेलीं अन् सुलतान हात चोळीत बसला!

तीं दोघेंहि इराणांत जाऊन पोहोंचलीं अन् त्याच दिवशीं त्या दोघांचें लग्न लागलें! त्या आनंदाप्रीत्यर्थ बादशहानें थाटाची मेजवानीहि दिली अन् त्यानंतर फिरोज अन् त्याची बायकोहि सुखानें नांदूं लागलीं!

कहाणी ऐकल्यावर शहर्यार चांदजादीला म्हणाला, 'तूं जी कहाणी सांगितलीस, ती ऐकून माझें मन मोहून गेलें आहे. मी तुझ्यावर खूष आहें. तुला रोज रात्रीं उत्तमोत्तम कहाण्या सांगाव्या

लागतील; पण जर एखाद्या रात्रीं तूं पुरी कहाणी सांगितली नाहींस, अगर तूं सांगितलेली कहाणी मला पसंत पडली नाहीं, तर लगेच तुझें शिर धडावेगळें केलें जाईल!'

तथापि तितक्यांत सूर्योदय झाल्यामुळें शहर्यार तिथून उठला अन् बाहेर गेला.

# अकरा

दुसऱ्या दिवशीं पहांटेला चांदजादीनें दुसरी एक कहाणी सांगायला सुरुवात केली–

या इराण देशांतलीच गोष्ट आहे ही. एका शहरांत दोघे भाऊ रहात होते. त्यांतल्या एकाचें नांव होतें कासिम अन् दुसऱ्याचें नांव होतें अलीबाबा. कासिमला त्याच्या सासऱ्याकडून बरीचशी संपत्ति मिळाली होती, त्यामुळें तो धनिक होता; पण अलीबाबा गरीब होता. तो लांकडांच्या मोळ्या विकून आपला संसार चालवीत असे. त्याचें लग्न एका गरिबाच्या मुलीशीं झालें होतें.

एक दिवशीं अलीबाबा लांकडें तोडण्यासाठीं जंगलांत गेला असतां त्याला कुणाचातरी गलबला ऐकूं आला. थोड्याच वेळांत कांहीं घोडेस्वार त्याला दिसले. कदाचित ते डाकू असावेत. ते सारे डाकू एका मोठ्या खडकापाशीं एकत्र जमले अन् ते मोठ्यानें ओरडले–

'खुल जा सम–सम !'

त्यावरोबर तो खडक आस्ते आस्ते बाजूला सरकला अन् त्याच्या जागीं एक दरवाजा असल्याचें अलीबाबाला दिसलें. तें सारें पाहिल्यावर अलीबाबा आश्चर्यचकित झाला. त्यानंतर ते सारे घोडेस्वार घोड्यांसह त्या दरवाजांतून आंत गेले. आंत गेल्यावर त्यांचा म्होरक्या ओरडला– 'बंद हो सम–सम ।'

त्यानें तसें म्हणतांच दरवाजा हळू हळू बंद झाला !

झाडावर लपून बसलेला अलीबाबा तें सारें पहात होता.

कांहीं वेळानें तो दरवाजा उघडला, सारे डाकू बाहेर येतांच त्यांचा म्होरक्या ओरडला, 'बंद हो सम–सम !' अन् दरवाजा पूर्वीसारखा झांकला गेला. त्यानंतर तो खडक दरवाजावर येऊन बसतांच सारे डाकू आपल्या घोड्यांसह तिथून दुसरीकडे निघून गेले !


अलीबाबा मनांत म्हणाला, 'तो खडक माझेंहि सांगणें ऐकतो कीं नाहीं तें पाहूं !'

त्यानंतर तो झाडावरून खालीं उतरला अन् त्या खडका-पाशीं जाऊन मोठ्यानें ओरडला– 'खुल जा सम–सम !'

त्याबरोबर तो खडक बाजूला सरकला अन् दरवाजा उघ-डला. अलीबाबानें त्या दरवाजांतून खालीं वांकून पाहिलें, तेव्हां त्याला चक्करच आली ! त्या गुहेंत सोन्याचे अन् चांदीचे ढीग पडले होते !

अलीबाबाला अतिशय आनंद झाला. तो त्या गुहेंत शिरला.

आपल्या अंगरख्याच्या साऱ्या खिशांत सोनें भरलें. त्यानंतर तो गुहेबाहेर आल्यावर त्यानें दरवाजा बंद करण्याचा आदेश दिला अन् दरवाजा बंद झाल्यावर तो धांवतपळत आपल्या घरीं आला.



तेवढें सोनें पाहिल्यावर अलीबाबाची बायको फारच खूष झाली. त्या सोन्याचें वजन किती आहे तें पहावें असें तिला वाटलें म्हणून तराजू आणण्यासाठीं ती आपल्या जावेच्या घरीं गेली.

अलीबाबाची बायको काय तोलते तें समजून घेण्यासाठीं कासिमच्या बायकोनें तराजूच्या पारड्यांच्या तळाशीं गोंद चिकटविला अन् तो तराजू अलीबाबाच्या बायकोला दिला.

अलीबाबाच्या बायकोनें सोन्याचीं नाणीं तराजूंत तोलल्यावर तो तराजू ती परत पोंचवून आली.

कासिमच्या बायकोला तराजूच्या पारड्याला सोन्याचें एक नाणें चिकटलेलें दिसतांच तिचे डोळे पांढरे झाले ! संध्याकाळीं

कासिम घरीं आल्यावर घडलेली सारी हकीकत तिनें त्याला सांगितली अन् तें सोन्याचें नाणेंहि त्याला दाखविलें.

कासिम लगेच अलीबाबाला जाऊन भेटला अन् त्यानें गुहेंतलें तें धन हस्तगत करण्याचा उपाय त्याला विचारला. तेव्हां भोळ्याभाबड्या अलीबाबानें सारी हकीकत त्याला मोकळ्या मनानें सांगितली. इतकेंच नव्हे तर त्या गुहेचा दरवाजा उघडण्या-झांकण्यासाठीं जे परवलीचे शब्द उच्चारावे लागत तेहि त्याला सांगितले !

अलीबाबाचें बोलणें ऐकल्यावर त्या गुहेंतली सारी संपत्ति आपण एकट्यानेंच हस्तगत करायची असें कासिमनें मनांत ठरविलें ! दुसऱ्यां दिवशीं सकाळीं भल्यामोठ्या पिशव्या घेऊन तो त्या खडकापाशीं गेला !

तिथें गेल्यावर तो 'खुल जा सम-सम।' असें मोठ्यानें ओरडतांच गुहेचा दरवाजा उघडला. कासिम गुहेंत शिरला. आंत सोन्याचांदीचे ढीग पडले होते ! कासिमनें घाईघाईनें आपल्या-जवळच्या पिशव्या सोन्या-चांदीनें भरल्या.

पिशव्या घेऊन तो दरवाजापाशीं आला; पण दरवाजा बंद झाला होता. तो मोठ्यानें ओरडला, 'दरवाजा उघड !'

तो घाबरल्यामुळें परवलीचे शब्द विसरला होता, त्यामुळें दरवाजा उघडला नाहीं ! त्यानें बराच वेळ डोकें खाजविलें; पण त्याला परवलीचे शब्द आठवेनातसे झाले !

कासिम निराश झाला अन् आंत अडकून बसला. तितक्यांत

ते डाकू परत आले. ते आंत शिरले अन् कासिमला पाहिल्यावर त्यांना चीड आली ! त्यांनीं तलवारीनें त्याचे चार तुकडे केले अन् पुन्हां दुसरा कुणी तिथें आला, तर त्याला आंत शिरण्याची हिंमत होऊं नये म्हणून ते चारहि तुकडे गुहेच्या तोंडाशीं टांगून ठेवले !

कासिम घरीं आला नाहीं म्हणून त्याचा तपास करण्यासाठीं अलीबाबा त्या खडकापाशीं गेला. तिथें आपल्या भावाच्या देहाचे टांगलेले तुकडे पाहून त्याला फार वाईट वाटलें. त्यानें ते चारहि तुकडे आपल्या गाढवावर लादले अन् ते आपल्या भावजयीला दाखविले.

आपल्या नवऱ्याच्या प्रेताची ती अवस्था पाहिल्यावर कासिमची बायको बेशुद्ध पडली. अलीबाबानें तिच्या तोंडावर पाणी शिंपडून तिला सावध केल्यावर ती मोठ्यानें रडूं लागली !

अलीबाबानें तिची समजूत केली अन् तो तिला म्हणाला, 'तुझी इच्छा असेल तर तूं माझ्या घरीं रहा; तथापि पहिला प्रश्न आहे प्रेताच्या दफनाचा. याला दुसऱ्या कुणी मारलें नसून हा आजारी पडून मेला आहे असें लोकांना वाटलें पाहिजे.'

अन् ती गोष्ट मारजीनामार्फत तडीला नेण्यांत आली ! मारजीना ही कासिमच्या घरांतली जुनी मोलकरीण होती. तिनें कासिम बरेच दिवस आजारी होता अन् आज तो मेला असें सर्वांना सांगितलें !

मारजीना फारच हुषार होती. ती मुस्तफा चांभाराच्या

घरीं गेली अन् त्याचे डोळे बांधून त्याला आपल्या घरीं घेऊन आली. तिनें आल्यावर प्रथम मुस्तफाला कांहीं सोन्याचीं नाणीं दिलीं अन् त्यानंतर त्याला कासिमचें प्रेत व्यवस्थित शिवण्यास सांगितलें. त्यानें तें शिवल्यावर परत त्याचे डोळे बंद केले अन् त्याला त्याच्या घरीं पोहोंचतें केलें. एक मुडदा शिवल्याबद्दल बराचसा मोबदला मिळाल्यामुळें मुस्तफा खूष झाला होता !

अलीबाबानें कासिमच्या मढ्याला मूठमाती दिली !

जेव्हां ते डाकू त्या गुहेपाशीं परत आले, तेव्हां त्यांना तिथें प्रेताचे तुकडे दिसले नाहींत. त्यामुळें ते तुकडे कुणीतरी पळवून नेले असावेत असा त्यांना संशय आला ! त्यांचा म्होरक्या म्हणाला, ‘ त्याचा तपास लावणें आवश्यक आहे. ’

त्यांतल्या एका डाकूनें व्यापाऱ्याचा वेष घेतला अन् तो बाजारांत गेला. नुकतेंच उजाडलें होतें. बाजारांतलीं दुकानें उघडलीं नव्हतीं. फक्त मुस्तफा चांभाराचें एकच दुकान उघडें होतें अन् मुस्तफा जुतीं शिवत बसला होता.

त्या डाकूनें त्याला विचारलें, ‘ इतकी नाजूक शिलाई तुम्ही कशी करतां हो ? ’

त्यावर मुस्तफा म्हणाला, ‘ छे, ही कसची नाजूक शिलाई ! मी तर याच्याहिपेक्षां नाजूक शिलाई करतों कीं, ती पाहिल्यावर तुम्ही तोंडांत बोटें घालाल ! कालच मीं एका माणसाच्या मुडद्याचे चार तुकडे बेमालूम सांधून दिले आहेत ! ’

डाकूनें विचारलें, ‘ या शहरांत मुडद्यांची शिलाई करण्याचा

प्रघात आहे कीं काय ?'

मुस्तफा हंसला अन् म्हणाला, 'मला यापेक्षां जास्त कांहीं सांगतां येणार नाहीं !'

त्या डाकूनें सोन्याचीं दोन नाणीं मुस्तफाच्या अंगावर फेकलीं अन् तो त्याला म्हणाला, 'तुम्ही काल जिथें मुडद्याची शिलाई केलीत ती जागा मला दाखवून द्या.'

मुस्तफा म्हणाला, 'ती जागा मला दाखवून देतां येणें अशक्य आहे; कारण एका बाईनें माझे डोळे बांधून मला तिथें नेलें होतें; पण मी तशांतहि प्रयत्न करून पहातों.'

थोड्याच वेळांत मुस्तफा त्या डाकूला घेऊन अलीबाबाच्या घरापाशीं जाऊन पोहोंचला. त्या डाकूनें अलीबाबाचें घर पाहून ठेवलें. मुस्तफाला परत पाठवून दिलें अन् आपण आपल्या म्होरक्यापाशीं जाऊन पोहोंचला. त्या डाकूची कामगिरी सफल झाल्याचें पाहून तो सरदार त्याच्यावर खूष झाला अन् पुढची कामगिरी पार पाडण्यासाठीं त्यानें एक उपाय शोधून काढला !

त्यानें चाळीस मोठीं मडकीं मागविलीं अन् प्रत्येक मडक्यांत सुरीसह एकेका डाकूला लपवून ठेवल्यावर त्या मडक्यांचीं तोंडें बंद केलीं !

त्यानंतर तीं सारीं मडकीं घोड्यांवर लादून तो डाकूंचा म्होरक्या अलीबाबाच्या घरीं गेला.

तिथें गेल्यावर तो अलीबाबाला म्हणाला, 'मी तेलाचा व्यापारी आहें. आतां रात्र झाली आहे अन् मीहि थकून गेलों

आहे. त्यासाठीं तेलानें भरलेलीं हीं मडकीं तुमच्या घरांत ठेवा अन् मलाहि रात्रभर झोंपण्यापुरती जागा द्या !'

अलीबाबानें त्या म्होरक्याला झोंपण्यासाठीं एक खोली दिली अन् त्याचीं चाळीसहि मडकीं दुसऱ्या एका खोलींत ठेवून दिलीं.

रात्रीं घरांतले दिवे विझूं लागले. घरांतलें तेल संपलें होतें, म्हणून ज्या खोलींत तेलाचीं चाळीस मडकीं ठेवलेलीं होतीं, त्या खोलींत तेल आणण्यासाठीं म्हणून मारजीना गेली, तेव्हां एका मडक्यांतून आवाज आला, 'आतां आम्ही बाहेर यावें का ?'

मडकें बोलल्याचें ऐकतांच सारी परिस्थिति मारजीनानें ओळखली. तिनें त्या मडक्याला सांगितलें, 'थोडा वेळ थांब !'

त्यानंतर मारजीना त्या खोलींतल्या प्रत्येक मडक्यापाशीं गेली, तेव्हां त्या मडक्यांतून तसाच आवाज आला. मारजीनानेंहि प्रत्येक मडक्याला ठराविक उत्तर दिलें.

इतकें झाल्यावर मारजीना स्वयंपाकगृहांत गेली अन् तिनें एका मोठ्या मडक्यांत पाणी तापत ठेवलें. पाणी उकळूं लागल्या-वर तिनें तें प्रत्येक मडक्यांत ओतलें अन् अशा रीतीनें तिनें त्या चाळीसहि डाकूंना मडक्यांतल्या मडक्यांत मारून टाकलें !

आतां त्या डाकूंचा 'सरदार' शिल्लक राहिला होता. मारजीनानें नर्तकीचा वेष घेतला अन् ती त्याच्या खोलींत जाऊन नृत्य करूं लागली. नाचतां नाचतां तिनें आपल्या कंबरेंत खोंच-

लेला धारदार सुरा बाहेर काढला अन् तो त्या 'सरदारा 'च्या काळजांत खुपसून त्याला ठार केलें.

मारजीनाची ती कर्तबगारी पाहून अलीबाबा खूष झाला अन् त्यानें तिला बक्षिसादाखल भरपूर सोनें दिलें.

त्या साऱ्या डाकूंना त्यानें मूठमाती दिली अन् त्यांचे घोडे विकून टाकले. त्यानंतर त्यानें त्या गुहेंतला सारा खजिना आपल्या घरीं आणला.

कहाणी संपतां संपतां सूर्योदय झाल्यामुळें शहर्यार उठून बाहेर गेला अन् त्यामुळें त्या दिवसापुरता चांदजादीचा जीव वांचला.

✦ ✦

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
ग्रा. क्र. ३६०६ नों दि ३/८/८६
वि. [illegible]

IRBK-0116564
IRBK-0116564

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. क्र. ९६०६४ नों दि ३/८/८०
वि. ग्रा-वा

खरें खोटे कुणास ठाऊक; पण असें सांगतात कीं, याप्रमाणें चांदजादी रोज एकेक गोष्ट सांगत होती अन् असें वर्षानुवर्षें कथाकथनाचें काम चालू होतें.

एका रात्रीं चांदजादी अशीच एक गोष्ट सांगत होती; पण तितक्यांत भूकंप झाला अन् त्या भूकंपामुळें राजवाडा जमीन-दोस्त होऊन त्याखालीं चांदजादी, सोनाजादी अन् शहर्यार अशीं तिघेंहि गाडलीं गेलीं.

त्या महालाच्या जागीं सध्यां भलामोठा मातीचा ढिगारा आहे. चांदण्या रात्रीं त्या मातीच्या ढिगाऱ्यावर दोघां स्त्रियांच्या अन् एक पुरुषाची अशा तिघांच्या छाया दिसतात अन् कुणीतरी स्त्री कहाणी सांगत असल्याचा आवाज ऐकूं येतो; पण उजाडतांच तिथें कुणीहि दिसत नाहीं असें सांगतात ! ती कहाणी सांगणारी चांदजादी असून शहर्यार नि सोनाजादी हीं दोघें ऐकणारीं आहेत असें म्हणतात !